


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शनिवार, दि. २० डिसेंबर २०२५




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०३५ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

# महायुती म्हणून लढायला अजित पवार गट तयार

## बैठकीनंतर पदाधिकाऱ्याच्या सुनील तटकरे यांचे संकेत

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

२९ राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी २३ डिसेंबरपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होणार असून, अजित पवार गटाने त्यादृष्टीने निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या बैठकीला प्रत्येक जिल्ह्यात नेमलेले समन्वयक, शहराध्यक्ष, जिल्हाध्यक्ष उपस्थित होते.

महायुतीसंदर्भात आमची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी बैठक अपेक्षित आहे. ती बैठक झाली तर राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांना महायुती म्हणून सामोरे जाण्याबाबत धोरण ठरविले जाईल, असे सुनील तटकरे यांनी बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना सांगितले.

महायुतीबाबत स्थानिक पातळीवर ठिकठिकाणी वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत. मी स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी बोलल्यानंतर भाजप प्रभारींशी चर्चा करत आहे. त्यामुळे या सर्व निवडणुका महायुती म्हणून लढण्याचे धोरण ठरेल, असे तटकरे यांनी पक्षाची भूमिका स्पष्ट करताना सांगितले.



स्थानिक पातळीवर मित्र पक्षांशी झालेल्या चर्चेचा तपशील घेतला समजून पक्षाच्या बैठकीत विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड, लातूर, उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, अहिल्यानगर, जळगाव, धुळे, पश्चिम महाराष्ट्रातील पिंपरी-चिंचवड, पुणे, सांगली, इचलकरंजी, कोल्हापूर, सोलापूर, मुंबई व ठाणे विभागातील कल्याण डोंबिवली, ठाणे शहर, मिरा-भाईंदर, वसई-विरार या महापालिका क्षेत्रातील प्रमुख पदाधिकाऱ्यांसोबत राजकीय परिस्थिती आणि महायुती म्हणून सामोरे जाताना नेमकी कोणती पावले उचलली गेली पाहिजेत, याबाबत चर्चा झाली. तसेच आतापर्यंत त्या-त्या महापालिकेत मित्रपक्षांशी झालेल्या चर्चेचा तपशील तटकरे यांनी संबंधित पदाधिकाऱ्यांकडून घेतला.

## थोडक्यात...

### नगरसेवक व्हायचंय? लिहा शहर विकासावर निबंध

पुणे (समर्थ गांवकरी) : महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरताना उमेदवारांना आता अर्जासोबतच शहर विकासासंबंधी निबंधदेखील सादर करावा लागणार आहे. 100 ते 500 शब्दमर्यादेत निवडून आल्यानंतर मतदारसंघात कोणत्या विकास योजना राबविणार आहेत, याची स्पष्ट मांडणी उमेदवारांना करावी लागणार आहे. निवडणूक आयोगाने 17 डिसेंबर रोजी काढलेल्या आदेशातील 'ब' क्रमांकात मतदारसंघ विकास योजनेबाबत स्पष्ट सूचना दिल्या आहेत. निवडणुकीत भ्रष्ट मार्ग अवलंबणार नाही, असे शपथपूर्वक जाहीर करावे लागणार आहे. याशिवाय, उमेदवाराने स्वतः, त्याची पत्नी, त्याच्यावर अवलंबून असलेल्या कोणत्याही व्यक्तीने अनधिकृत बांधकाम केलेले नाही, असे शपथपत्रात नमूद करावे लागेल.

### पाण्याची 'महा'काय टाकी फुटली

नागपूर (समर्थ गांवकरी) : 15 लाख लिटर पाणी साठवणूक असलेल्या टाकीतील पाण्याचे टेस्टिंग सुरु असताना टाकी फुटली. त्यामुळे 7 कामगारांचा मृत्यू झाला. पाण्याचा दाब आणि टाकीच्या लोखंडी पत्र्यांमुळे जवळच काम करीत असलेल्या तीन कामगारांचा घटनास्थळी, तर चौघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. 10 कामगार गंभीर जखमी झाले. यातील तिघे अत्यवस्थ आहेत. त्यांच्यावर नागपुरातील एम्स आणि मेडिकल हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु आहेत. ही घटना बुटीबोरी एमआयडीसी परिसरात असलेल्या 'अवाडा' कंपनीच्या आवारात शुक्रवारी सकाळी 11:30 वाजेच्या सुमारास घडली.

# भाजपला मित्रांचे मन वळवावे लागेल; काँग्रेसचा 'स्वबळ'चा नारा

**धुळे: (समर्थ गांवकरी)**

गत महापालिका निवडणूकीत तब्बल १५ वर्षाच्या इतिहासात ७४ पैकी ५२ जागा आपल्याकडे ओढून आणत सत्ता काबीज करण्यात भाजपला यश मिळविता आले. यंदा जागा वाटपावरून महायुतीत ही पेच निर्माण झाला आहे. काँग्रेसने आधीच स्वबळाचा नारा दिल्याने मविआतही बिघाडी होऊ शकते. गेल्या निवडणूकीत राज्यात भाजप आणि शिवसेनेची युती होती, परंतू जागा वाटपावरून धुळे महापालिकेची युती फिस्कटल्याने भाजपासह अन्य पक्षाने स्वतंत्र निवडणूक लढविली होती. त्यात भाजपने ७४ पैकी ५२ जागा मिळविल्या होत्या तर शिवसेनेला केवळ एकच जागेवर समाधान मानावे लागले होते. या निवडणुकीतही भाजपाने ७४ पैकी दोघा मित्रपक्षाला १९ जागा देण्याचे




कबुल केले आहे. परंतु, शिंदेसेना आणि राष्ट्रवादी (अजित पवार) गट १९ जागा मान्य करणार नाही. त्यामुळे महायुती होईल, असे वाटत नाही.

मविआतही काँग्रेसने स्वबळाचा नारा दिला. पण मनसे आणि उद्धवसेनेत युती होण्याची शक्यता आहे. एमआयएम सुद्धा स्वतंत्र पणे लढणार आहे.

# कोकाटेंची शिक्षा कायम, अटक टळली!

- उच्च न्यायालय म्हणाले, प्रथमदर्शनी पुरावे उपलब्ध, दोषसिद्धीला स्थगिती देता येणार नाही

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

खोटे प्रतिज्ञापत्र सादर करून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी असलेल्या सरकारी गृहनिर्माण योजनेच्या लाभप्रकरणी माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांचा प्रथमदर्शनी सहभाग स्पष्टपणे सिद्ध झाल्याचे निरीक्षण नोंदवत, मुंबई उच्च न्यायालयाने शुक्रवारी त्यांची दोषसिद्धी स्थगित करण्यास ठाम नकार दिला. मात्र, न्यायालयाने त्यांच्या दोन वर्षांच्या कारावासाच्या शिक्षेला स्थगिती देत त्यांना तात्पुरता दिलासा दिला.

'खोटे प्रतिज्ञापत्र सादर करून सरकारी योजनेतील फ्लॅट मिळविल्याचा आरोप असलेल्या प्रकरणात अर्जदाराचा सहभाग असल्याचे प्रथमदर्शनी पुरावे उपलब्ध आहेत. त्यामुळे दोषसिद्धीला स्थगिती देता येणार नाही,' असे निरीक्षण न्या. आर. एन. लड्डा यांनी नोंदविले.

कनिष्ठ न्यायालयाने कोकाटे



यांना दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली होती. खटल्यादरम्यान तसेच सत्र न्यायालयातील अपीलाच्या काळात ते जामिनावर होते. उच्च न्यायालयाने त्यांना एक लाख रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर करत, सत्र न्यायालयाच्या निर्णयाविरोधात दाखल केलेली त्यांची पुनर्विलोकन याचिका मंजूर केली. न्यायालयाने साखर कारखान्याच्या अकाउंटंटच्या साक्षीचा संदर्भ देत म्हटले की, गुन्ह्याच्या काळात कोकाटे यांचे उत्पन्न जास्त होते. फ्लॅट वाटपापूर्वी सरकारी अधिकाऱ्यांनी कागदपत्रांची पुरेशी छाननी करताना निष्काळजीपणा केला.

कोकाटे यांच्या वतीने ज्येष्ठ वकील रवी कदम आणि ॲड. अनिकेत निकम १ यांनी दोषसिद्धीला स्थगिती देण्याची मागणी केली. दोषसिद्धी कायम राहिल्यास आमदारकी जाईल आणि ते लोकप्रतिनिधी असल्याने हे अपवादात्मक प्रकरण असल्याचा युक्तिवाद त्यांनी केला. मात्र, या मागणीला विरोध करणारे मध्यस्थी अर्ज उच्च न्यायालयात दाखल करण्यात आले. सरकारी वकील मनकुँवर देशमुख यांनीही कोकाटे यांच्या जामीन अर्जाला विरोध केला.

सर्व बाजूंचे युक्तिवाद ऐकून न्यायालयाने स्पष्ट केले की, केवळ शिक्षेची अंमलबजावणी स्थगित आहे या कारणावरून गुन्हेगारी प्रकरणात दोषी ठरलेल्या व्यक्तीला मंत्रिपदावर राहू देणे सार्वजनिक सेवेचे भरून न येणारे नुकसान ठरू शकते. हे कोणतेही अपवादात्मक प्रकरण नाही आणि प्रथमदर्शनी गुन्हा सिद्ध झाल्याचे स्पष्ट आहे. त्यामुळे दोषसिद्धीला स्थगिती दिली जाणार नाही.

'अशा निर्णयामुळे लोकशाही संस्थांवरील जनतेचा विश्वास कमी होईल व कायद्याचे पालन करणाऱ्यांचे मनोबल खचेल. लोकप्रतिनिधित्व व कायदेशीर जबाबदारी यांचा समतोल राखणे आवश्यक आहे,' असे न्यायालयाने म्हटले. हे प्रकरण १९८९ ते १९९२ या कालावधीतील असून, त्या काळात राज्य सरकारने गरजूंसाठी गृहनिर्माण योजना सुरू केली होती. या योजनेत वार्षिक उत्पन्न ३० हजार रुपयांपेक्षा कमी असलेल्या व्यक्तींनाच पात्रता होती.

# उद्धवसेना व मनसे नेत्यांच्या चर्चेत काही जागांवरून तिढा

## आ. अनिल परब यांनी घेतली राज ठाकरे यांची भेट

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

मुंबई महापालिका निवडणुकीसाठी उद्धवसेना व मनसे नेत्यांची जागावाटपाबाबत चर्चा सुरू आहे. काही जागांबाबत तिढा निर्माण झाल्याने त्याचा निर्णय दोन्ही पक्षप्रमुख घेणार आहेत. याचदरम्यान उद्धवसेनेचे आ. अनिल परब यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची शुक्रवारी शिवतीर्थ निवासस्थानी भेट घेऊन अर्धा तास चर्चा केली. त्यानंतर परब यांनी मातोश्रीवर उद्धवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन राज यांच्यासोबत झालेल्या चर्चेची माहिती दिली.




उद्धवसेनेकडून आ. परब, आ. वरुण सरदेसाई तर मनसेकडून बाळा नांदगावकर, नितीन सरदेसाई हे चर्चा करीत आहेत. गेले काही दिवस दोन्ही पक्षांमध्ये जागावाटपावर सातत्याने बैठका होत आहेत. मात्र, काही जागांबाबत अद्याप दोन्ही पक्षांचे एकमत न झाल्याने युतीची घोषणा पुढे ढकलण्यात आली आहे. तसेच, ही घोषणा पत्रकार परिषदेद्वारे करायची की संयुक्त मेळाव्याद्वारे यावर अद्याप निर्णय झालेला नाही. त्यामुळे या मुद्द्यांबाबत आ. परब यांनी राज यांच्यासोबत चर्चा केल्याची माहिती सूत्रांनी दिली.

मनसे नेते नितीन सरदेसाई या भेटीबाबत म्हणाले, विजय मिळविणे अंतिम लक्ष्य आहे. त्यामुळे जागावाटपाच्या चर्चेत प्रत्येक प्रभागाचा विचार केला जात आहे.

## शरद पवार यांचा प्रस्ताव



उद्धवसेना व मनसे युतीमध्ये शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला सोबत घेण्याचा प्रस्ताव आमच्याकडे आलेला नाही. त्यांचा प्रस्ताव उद्धवसेनेकडे आला असेल तर त्याबाबत ते राज ठाकरे यांना कळवतील. तर, मुंबईत ठाकरे यांचे अस्तित्व आहे की नाही, अशी टीका करणाऱ्यांना त्याचे उत्तर १६ जानेवारीला मिळेल, असेही सरदेसाई म्हणाले.




**जाहीरात सौजन्य :** भीमाशंकर तोरमल जिल्हाध्यक्ष अहील्यानगर जिल्हा शिक्षक व शिक्षकेतर संघटना अहिल्यानगर, आत्माराम रंधे कार्यकारी संचालक जनलक्ष्मी पतसंस्था अकोले, अशोकराव शिंदे माजी कार्यकारी संचालक दूधगंगा पतसंस्था अकोले अनिल नाईकवाडी माजी संचालक दूधगंगा पतसंस्था अकोले

# नगरपरिषद निवडणुकीचा दुसरा टप्पा; रविवारी निकाल

## २३ नगरपरिषदांचे अध्यक्ष आणि १४३ सदस्य निवडण्यासाठीचे मतदान

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील २३ नगरपरिषदांचे अध्यक्ष आणि सदस्य तसे विविध नगरपरिषदा व नगर पंचायतींमधील १४३ सदस्य निवडण्यासाठीचे मतदान शनिवारी होणार असून पहिल्या व दुसऱ्या टप्प्यातील निवडणुकीचे निकाल २१ डिसेंबरला जाहीर करण्यात येणार आहेत. राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील २८८ नगरपरिषदा व नगर पंचायतींच्या निवडणुकीचा कार्यक्रम ४ नोव्हेंबरला जाहीर केला होता. त्यानुसार २ डिसेंबरला २६३ नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठी मतदान झाले. उर्वरित ठिकाणी उद्या मतदान होणार आहे. राज्यभरातील नगरपरिषद, नगरपंचायतींसाठीची मतमोजणी २१ डिसेंबरला संबंधित ठिकाणी सकाळी १० वाजता सुरू होईल. सायंकाळपर्यंत सर्व निकाल हाती येतील अशी शक्यता आहे. महायुतीतील भाजप, शिंदेसेना आणि अजित पवार गट अनेक ठिकाणी एकमेकांविरुद्ध लढले.

महापालिका निवडणूक सुरळीत पार पाडण्यासाठी आणि आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी पुरेशा भरारी पथकांची स्थापना करावी, असे निर्देश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी शुक्रवारी एका बैठकीत दिले. वाघमारे यांनी राज्यातील सर्व महापालिका आयुक्त आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची ऑनलाइन बैठक घेतली. आयोगाचे सचिव सुरेश काकाणी आदी उपस्थित होते. काकाणी यांनी बैठकीत सादरीकरण केले. महानगरपालिकेसंदर्भातील अधिनियम व राज्य निवडणूक आयोगाचे विविध आदेश यासंदर्भात त्यांनी माहिती दिली.

महापालिकांची रंगीत तालीम

विरोधी महाविकास आघाडीतील पक्षही अनेक ठिकाणी एकमेकांविरुद्ध रिंगणात होते. त्यामुळे निकालाबाबत कमालीची उत्सुकता आहे. राज्यातील लहान शहरांचा कौल कोणाला याचा फैसला या निमित्ताने होणार आहे. राज्यातील २९ महापालिकांसाठी १५ जानेवारीला मतदान होत आहे. त्यामुळेही नगर परिषद निवडणुकीच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## आचारसंहितेची कठोर अंमलबजावणी करावी

1. भरारी पथकांच्या माध्यमांतून आचारसंहितेची कठोर अंमलबजावणी झाली पाहिजे. त्यासाठी महापालिका आयुक्तांनी पुरेशा मनुष्यबळाची व्यवस्था करावी; तसेच कायदा व सुव्यवस्था चोख राखण्यासाठी पोलिस यंत्रणेसोबत समन्वय साधावा.
2. त्याचबरोबर निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात संबंधित प्रभागांचे नकाशे, प्रभागातील जागानिहाय आरक्षण, नामनिर्देशनपत्र व शपथपत्राचे नमुने, इतर आवश्यक अधिकारी/कर्मचारी, आवश्यक साहित्य आदींची त्वरित व्यवस्था करण्यात यावी.
3. २ डिसेंबर रोजी मतदान झालेल्या २६३ नगरपरिषदा व नगरपंचातीचा अनुभव लक्षात घेता मतदारांना सहज व सुलभरीत्या मतदान करता यावे, यासाठी मतदान केंद्रांवर किमान सेवा-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. शक्य असलेल्या ठिकाणी आदर्श मतदान केंद्रे किंवा पिंक मतदान केंद्रांची उभारणी करावी, अशा सूचना देण्यात आल्या.

### आढळा परिसरातील भातोडानगर ठाकरवाडी येथे डॉ. विश्वासराव आरोटे यांच्याकडून विद्यार्थ्यांना

# शालेय साहित्य व महिलांना साड्यांचे वाटप!







**अकोले: (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील आढळा परिसरातील देवठाण येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भातोडानगर ठाकरवाडी येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे तसेच महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले. हे वितरण महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समूह यांच्या वतीने आयोजित करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विश्वासराव आरोटे (राज्य सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ तसेच संपादक, दैनिक समर्थ गांवकरी) होते.

यावेळी बोलताना डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण हे अनेक वर्षांपासून सातत्याने सुरू आहे. "दानधर्म करताना मंदिरात देव असतो हे खरे, पण खरे दैवत म्हणजे लहान गोपाळ आहेत. जिल्हा परिषद शाळा आजही शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहेत," असे त्यांनी नमूद केले.

पालकांनी आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे वेळोवेळी लक्ष देणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. "प्रत्येक वेळी शिक्षकांनाच दोष देण्यापेक्षा, पालकांनी मुलांच्या प्रगतीसाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे. दिलेला वेळ किती आहे यापेक्षा तो गुणवत्तेचा आणि परिणामकारक असावा," असे ते म्हणाले. कोरोनाच्या काळात जीवनातून अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या असून, "खरी संपत्ती म्हणजे आपली मुलेच आहेत," असा संदेशही त्यांनी दिला.

कार्यक्रमात शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कानवडे यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन डॉ. विश्वासराव आरोटे यांचा सत्कार केला. तर आभारप्रदर्शन श्रीमती सहाणे मॅडम यांनी केले. कार्यक्रमास शिक्षकवर्ग, पालक, ग्रामस्थ तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फुलवळमध्ये दर्शवेळा अमावस्या उत्साहात साजरी

### बळीराजा कडुन धरतीमातेचे पुजन



**कंधार : (समर्थ गांवकरी)**

फुलवळ सह परिसरात दर्शवेळा अमावास्येचा सण दि १९ डिसेंबर रोजी मोठ्या भक्तीभावात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. ग्रामीण संस्कृतीतील अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा हा सण साजरा करण्यासाठी शेतकरी बांधवांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. यानिमित्ताने फुलवळसह परिसरातील शेतशिवारात चैतन्याचे वातावरण होते. सकाळपासूनच शेतकऱ्यांनी आपल्या कुटुंबासह शेतात जाऊन पूजन केले. ज्वारी, गहु आणि विविध कडधान्यांच्या पिकांची पूजा करून निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या दिवशी शेतात पारंपरिक पदार्थांचा नैवेद्य दाखवून सहभोजनाचा आनंद लुटला जातो. या निमित्ताने गावकरी आणि नातेवाईक एकत्र आल्याने शेतशिवारांना जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. दर्शवेळा अमावास्या, जिला अनेक ठिकाणी 'वेळ अमावास्या' असेही म्हटले जाते, हा सण मुख्यत्वे दक्षिण महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमाभागात साजरा होतो. हा सण म्हणजे धरतीमाता आणि पिकांच्या समृद्धीसाठी केलेली प्रार्थना आहे. पिके जोमात आल्यावर त्यांची पूजा करून भविष्यात उत्तम उत्पादन मिळावे, हा यामागचा मुख्य उद्देश असतो.

## निवडणुकांसाठी शरद पवारांची महत्त्वपूर्ण बैठक

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी मुंबई येथील सिल्वर ओक या निवासस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरदचंद्रजी पवार साहेब यांची छत्रपती संभाजीनगर व अहिल्यानगर महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

या बैठकीस छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे निरीक्षक व प्रांत उपाध्यक्ष हाजी शौकतभाई तांबोळी, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण जिल्हाध्यक्ष पांडुरंगराव तांगडे पाटील, तसेच पक्षाचे शहराध्यक्ष ख्वाजा शरपोद्दिन मुल्ला यांनी शरद पवार साहेबांची भेट घेतली. यावेळी पक्षाचे माजी प्रांताध्यक्ष व माजी मंत्री जयंतराव पाटील साहेब उपस्थित होते. या बैठकीमध्ये आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या दृष्टीने महाविकास आघाडीतील घटक पक्षांसोबत स्थानिक पातळीवर युती, जागावाटप, निवडणूक रणनीती, प्रचार यंत्रणा मजबूत करण्याबाबत, तसेच दोन्ही महानगरपालिकांसाठी स्टार प्रचारकांच्या सभा आयोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच महानगरपालिका निवडणुकांच्या अनुषंगाने उबटा शिवसेनेचे नेते खासदार संजय राऊत यांच्याशीही चर्चा करण्यात आल्याची माहिती दिली.

आगामी काळात छत्रपती संभाजीनगर व अहिल्यानगर महानगरपालिका निवडणुकांमध्ये महाविकास आघाडी अधिक ताकदीने उतरावी, यासाठी संघटनात्मक बांधणी व प्रभावी प्रचार यावर विशेष भर देण्यात येणार असल्याचे या बैठकीत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे निरीक्षक व प्रांत उपाध्यक्ष हाजी शौकतभाई तांबोळी यांनी माहिती दिली.

## २० जुगारी मालमुद्यासह जेरबंद

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

शहर पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे हे पथकासह रात्री आस्थापना बंद करत असताना शहरातील कोठला परिसरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर धाड टाकून सुमारे एक लाख ३० हजार ३०० रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत तिरट नावाच्या हार-जीताच्या जुगारात सहभागी असलेल्या २० जणांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई पोलीस उपअधीक्षक डॉ. टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक गणेश वारूळे, अंमलदार गणेश चव्हाण, सचिन मिरपगार, सुजय हिवाळे, इनामदार, रमेश शिंदे, कदम यांच्या पथकाने कोठला येथील कुरेशी हॉटेलच्या पाठीमागील पत्र्याच्या शेडमध्ये केली आहे.

## अनधिकृत बांधकामे आढळल्यास तात्काळ कारवाईचे निर्देश


**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात आदर्श आचारसंहिता लागू असताना कोणत्याही प्रकारच्या अनधिकृत बांधकामांना थारा देऊ नये, असे स्पष्ट आदेश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. आचारसंहिता काळात नवीन बांधकाम, वाढीव बांधकाम तसेच परवानगीविना सुरू असलेल्या कामांवर तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी आज झालेल्या बैठकीत सर्व प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्तांना दिले आहेत. तसेच शहरात कुठेही नव्याने अनधिकृत बांधकाम होत असल्याचे निदर्शनास आल्यास नागरिकांनी याबाबत महापालिकेस कळविल्यास त्यावर महापालिकेमार्फत तात्काळ कारवाई करण्यात येईल असेही आयुक्तांनी यावेळी नमूद केले. ठाणे महापालिकेच्या नागरी संशोधन केंद्र येथे आज आयुक्त सौरभ राव यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त (2) प्रशांत रोडे, उपायुक्त उमेश बिरारी, जी.जी. गोदेपुरे, मनीष जोशी, सचिन सांगळे यांच्यासह नऊ प्रभागसमितीचे सर्व सहाय्यक आयुक्त उपस्थित होते. आचारसंहितेच्या काळात शहरात महापालिकेची संपूर्ण यंत्रणा ही निवडणुकीच्या कामात व्यस्त असल्यचा फायदार घेवून शहरात अनधिकृतपणे नवीन बांधकामे होण्याची शक्यता असते. यासाठी सर्व सहायक आयुक्त यांनी आपापल्या प्रभागसमिती कार्यक्षेत्रात नवीन होणाऱ्या बांधकामांकडे लक्ष ठेवावे. सर्व सहायक आयुक्त यांचेवर जरी निवडणुकीच्या कामाची जबाबदारी सोपविण्यात आली असली तरी त्यांनी प्रभागात नियमित तपासणी मोहिमेच्या माध्यमातून अनधिकृत बांधकामे होणार नाही याची दक्षता घ्यावयाची आहे. आचारसंहिता काळात नियमांचे उल्लंघन करुन अनधिकृतपणे नवीन बांधकामे शहरात सुरू झाली तर त्यावर निष्कसनाची कारवाई करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहेत. तसेच, अनधिकृत करणाऱ्या व्यक्तीवर जबाबदारी निश्चित करून कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. आचारसंहिता काळात कोणालाही सूट देण्यात येणार नसल्याचे आयुक्त सौरभ राव यांनी स्पष्ट केले.

नागरिकांनी कोणत्याही प्रकारचे अनधिकृत बांधकाम सुरू असल्यास महापालिकेकडे तात्काळ तक्रार नोंदवावी, या तक्रारीची दखल घेवून महापालिकेच्या माध्यमातून तात्काळ कारवाई करण्यात येईल असेही आयुक्त सौरभ राव यांनी या बैठकीत नमूद करीत ठाणेकरांनी सजग राहून नव्याने होणाऱ्या अनधिकृत बांधकामांची माहिती कळवून महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन केले आहे.

## आरोग्य उपसंचालकांसह जिल्हा शल्यचिकित्सक करणार नगर जिल्हा परिषदेच्या दिव्यांग प्रमाणपत्रांची तपासणी



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

### ३१ डिसेंबरपर्यंत शासनाला अहवाल पाठवणार

दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंडे यांच्या आदेशावरून राज्यभर शासकीय दिव्यांग कर्मचाऱ्यांची तपासणी होत आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेने गेल्या महिन्यात तालुकानिहाय शिबिरे घेऊन कागदपत्रांची पडताळणी केली. त्यातील २५० दिव्यांगांची पुन्हा तपासणी करून त्यांना प्रमाणपत्रे दिली जाणार आहेत. या तपासणीचा अहवाल ३१ डिसेंबरपर्यंत शासनाला पाठवला जाणार आहे

जिल्हा परिषदेच्या सेवेत असलेल्या ५५० दिव्यांग कर्मचाऱ्यांपैकी २५० जणांची तपासणी जिल्हा रुग्णालयात जिल्हा शल्यचिकित्सक व नाशिकला आरोग्य उपसंचालक विभागाकडून करण्यात येणार आहे. यासाठी कर्णबधीर, अल्पदृष्टी अशा १६२ जणांना नाशिकला, तर उर्वरित अस्थिव्यंग व इतर अशा ८८ जणांची तपासणी अहिल्यानगर जिल्हा रुग्णालयात होणार आहे. यासाठी जिल्हा परिषदेने संबंधित वैद्यकीय यंत्रणेकडून तपासणीचे वेळापत्रक मागवले आहे.

गेल्या काही दिवसांत अनेकांनी बोगस दिव्यांग प्रमाणपत्र काढून सरकारी नोकरी मिळवली किंवा नोकरीत लाभ मिळवले अशा तक्रारी असल्याने जिल्हा परिषदेने आपल्या ५५० दिव्यांग कर्मचाऱ्यांची यादीच संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे.

या यादीत दिव्यांग शिक्षकांसह ग्रामपंचायत, आरोग्य, महिला बालकल्याण अशा सर्व विभागांतील कर्मचाऱ्यांची नावे आहेत. या कर्मचाऱ्यांच्या दिव्यांगपणाबाबत काही हरकती असतील तर त्या लेखी स्वरूपात जिल्हा परिषदेने मागविल्या होत्या. दिव्यांग कल्याण विभागाच्या आदेशावरून राज्यभर दिव्यांग कर्मचाऱ्यांची पडताळणी सुरू झाली आहे.त्यानुसार जिल्हा परिषदेने तालुकास्तरीय पडताळणी समिती नेमून ही तपासणी केली.

या समितीत तालुका आरोग्य अधिकारी, ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक, पंचायत समितीतील सहायक प्रशासन अधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांचा समावेश होता. या समितीने एकूण ५५० जणांची कागदपत्रे तपासणी केली. त्यातून जे प्रत्यक्ष डोळ्याला दिसतात अशा लाक्षणिक दिव्यांगांना वगळून इतर २५० जणांना पुढील तपासणीसाठी संदर्भित केले.

## रस्ते, पाणी, आरोग्य, रोजगाराचा बोजवारा

**मुखेड : (समर्थ गांवकरी)**

शहरातील मूलभूत नागरी सुविधा कोलमडल्या असून नागरिकांना अक्षरशः तारेवरची कसरत करत जगावे लागत आहे. रस्ते नसल्याने, नाल्या तुंबल्याने आणि रस्त्यांवर गजाळी वाढल्याने अपघातांचे प्रमाण वाढले आहे. अनेक ठिकाणी नागरिक पडत आहेत, तर काही सावरत सावरत जीव मुठीत घेऊन चालताना दिसत आहेत. दुर्गंधी, साचलेले पाणी आणि डासांची मोठ्या प्रमाणावर पैदास यामुळे डेंग्यू, ताप व इतर आजार बळावत आहेत. शासकीय दवाखान्यांत डॉक्टर व औषधांचा तुटवडा असल्याने रुग्णांना खासगी दवाखान्यात हजारो रुपये खर्च करावे लागत आहेत. महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. सोन्याच्या दरवाढीचा थेट फटका महिलांना बसत असून अनेक कुटुंबांनी मंगळसूत्रातील सोन्याचे मणी कमी करण्याचा मार्ग स्वीकारला आहे.

## सिस्पे इन्फिनिटी बिकन कंपनीच्या संचालक विनायक मराठे यांचा जामीन फेटाळला



**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

जोपर्यंत प्रमुख संचालकांना अटक होत नाही, तोपर्यंत गुंतवणूकदार व छोट्या नफ्याच्या आमिषाने फसवणूक झालेल्या एजंट्सना न्याय मिळणे अशक्य असल्याचे मत न्यायालयात गुंतवणूकदारांच्या वतीने युक्तिवाद करताना ॲड. साके यांनी मांडले. तसेच गुंतवणूक केलेल्या रकमेच्या तुलनेत जप्त रक्कम खूप कमी असल्याने अशा स्थितीत आरोपींना जामीन दिल्यास गुंतवणूकदारांवर मोठा अन्याय होईल, असा ठाम युक्तिवाद करण्यात आला. दोन्ही बाजूंचे सविस्तर युक्तिवाद ऐकून घेत न्यायालयाने विनायक मराठे यांचा जामीन अर्ज फेटाळला. या निर्णयामुळे सिस्पे इन्फिनिटी बिकन कंपनीविरोधात सुरू असलेल्या गुंतवणूकदारांच्या न्यायलढ्याला मोठे बळ मिळाले आहे.

सिस्पे इन्फिनिटी बिकन कंपनीच्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात जिल्हा व सत्र न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. आर्थिक गुन्हे शाखेच्या ताब्यात असलेले ट्रेडस फायनान्शिअल कंपनीचे संचालक विनायक ज्ञानेश्वर मराठे यांचा जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायाधीश क्रमांक दोन, अहिल्यानगर यांनी मंगळवार दि.१७ डिसेंबर २०२५ रोजी फेटाळून लावला. सिस्पे इन्फिनिटी बिकन कंपनीचे इतर सर्व संचालक फरार असतानाच विनायक मराठे हे आर्थिक गुन्हे शाखेच्या कारवाईत अडकले होते. आरोपीतर्फे अटक प्रक्रिया चुकीच्या पद्धतीने झाल्याचा तसेच आपण संचालक पदाचा राजीनामा दिल्याचा युक्तिवाद न्यायालयासमोर करण्यात आला. मात्र, सदरील प्रकरणातील मूळ फिर्यादी यांच्या वतीने ॲड. शुभम रमेशराव साके यांनी प्रकरणाच्या गांभीर्याकडे न्यायालयाचे लक्ष वेधले.

इतर संचालक परागंदा असून कंपनीसाठी कार्यरत असलेल्या एजंट्सना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी नमूद केले.

## अल्पसंख्यांक हक्क दिन उत्साहात

**पाथर्डी: (समर्थ गांवकरी)**

प्रवरा माध्यमिक विद्यालयात गुरुवार दि. १८ डिसेंबर रोजी'अल्पसंख्यांक हक्क दिन 'मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. डॉ. एपीजे अब्दुल कलाम आणि पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी विद्यालयातील पाचवी ते सातवी व आठवी ते दहावी या दोन गटांमध्ये अल्पसंख्यांक हक्क दिनावर निबंध स्पर्धा तसेच चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.




नांदेड आगामी महानगरपालीका निवडणूक अनुषंगाने काँग्रेस पक्षाच्या वतीने इच्छुक उमेदवारां च्या मुलाखती नवीन मोंढा पक्ष कार्यालय येथे घेण्यात आल्या. या प्रसंगी नांदेड प्रभारी खासदार काळे तसेच नांदेडचे खासदार रवींद्र चव्हाण . नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष राजेश पावडे नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष हनमंत पाटील बेटमोगरेकर नांदेड प्रदेश काँग्रेस कमिटी कार्यालयाचे पदाधिकारी उपस्थित होते व युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष यांच्या सह इच्छुक उमेदवारा सह पदअधिकारी यांची मोठया प्रमाणात उपस्थिती होती.

# वार्षिक स्नेहसंमेलनात कला, इतिहास आणि समाजभानाचा संगम

### लालटाकी रोडवरील महाराष्ट्र बालक मंदिर शाळेतील विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



लालटाकी रोडवरील महाराष्ट्र बालक मंदिर शाळेतील वार्षिक स्नेहसंमेलन यंदा केवळ एक कार्यक्रम न राहता, संस्कृतीचा उत्सव, इतिहासाचा जागर आणि समाजमन जागृत करणारी चैतन्यलहरी ठरले. रंगमंचावर उलगडत गेलेल्या सुर–ताल, भाव–भक्ती आणि शौर्य–संकल्प यांच्या आविष्काराने उपस्थित पालक मंत्रमुग्ध झाले.

महाराष्ट्राची लोकधारा साकारत गेली पोवाडा, गवळण, लावणी आणि लोकनृत्यांच्या ठेक्यांतून मराठी मातीचा सुगंध दरवळला. टाळ–मृदंगाच्या निनादात परंपरेचा श्वास प्रेक्षकांच्या हृदयात उतरला. राष्ट्रभक्तीपर गीताने झाली. मातृभूमीप्रती निष्ठा आणि समर्पण जागवणाऱ्या स्वरांनी देशप्रेमाची ज्योत प्रज्वलित केली.

श्रीकृष्ण–राधेच्या अलौकिक होळीगीताने भक्तीरसाची रंगीत उधळण केली. राधे–कृष्णाच्या दिव्य लीलेत न्हालेल्या सुरांनी प्रेम, समर्पण आणि आनंद यांचे भावविश्व उलगडले. 'राधे राधे राधे, तेरे बिना कृष्णा लगे आधे आधे' या गवळणीने रसिकांना वृंदावनाच्या रम्य वातावरणात नेऊन ठेवले.शिवतांडव व अघोरी नृत्य फ्युजनने रौद्र आणि अध्यात्म यांचा अद्वितीय संगम साकारला. उग्र हालचाली, तीव्र ताल आणि प्रभावी नेपथ्य यांच्या माध्यमातून शक्ती, साधना आणि संकल्प यांचे दर्शन घडले. या सादरीकरणाने रंगमंचावर जणू ऊर्जा आणि आत्मबळाचा साक्षात्कार घडवला.

इतिहासाच्या तेजस्वी पानांना उजाळा देताना धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांवरील 'रणी भडकला, नवी तळपला भगव्याचा अंगार' या गीताने वीररसाचा ज्वालामुखी पेटवला. अन्याय, अत्याचार आणि मुघल सत्तेच्या क्रौर्यापुढे न झुकणाऱ्या संभाजी महाराजांच्या शौर्याने सभागृह भारावून गेले. भगव्या ध्वजाची तळपती ज्योत मनामनांत स्वराज्यनिष्ठेचा संकल्प चेतवून गेली.

समाजातील अन्यायाविरुद्ध आवाज उठवणाऱ्या स्त्री हत्याचारविरोधी 'महाकालीचा जागर' या सादरीकरणाने शक्ती, निर्भयता आणि न्यायाची जाणीव जागवली. महाकालीच्या उग्र रूपातून स्त्रीशक्तीचा हुंकार घुमला आणि स्त्री सुरक्षिततेचा गंभीर संदेश ठळकपणे पोहोचवला.

मोबाईलच्या पडद्यामागील वास्तव उलगडणारे गीत रसिकांच्या मनाला भिडले. आधुनिक युगातील मोबाईलच्या वाढत्या वापराचे दुष्परिणाम अधोरेखित करणारे सामाजिक प्रबोधनपर गीत कार्यक्रमात सादर करण्यात आले. या गीतातून मोबाईलच्या अतिवापरामुळे निर्माण होणारी एकाकीपणा, कौटुंबिक संवादातील दुरावा, मुलांवरील मानसिक परिणाम आणि समाजात वाढणारी अलिप्तता प्रभावी शब्दांत मांडण्यात आली.अभ्यास, आरोग्य आणि नातेसंबंधांवर होणारा परिणाम श्रोत्यांच्या अंतर्मनाला स्पर्श करून गेला. सादरीकरणाच्या शेवटी 'तंत्रज्ञान वापरावे, पण त्याचे गुलाम होऊ नये' हा स्पष्ट संदेश देण्यात आला. मोबाईलचा संतुलित वापर, प्रत्यक्ष संवादाचे महत्त्व आणि कुटुंबीयांशी नातेसंबंध जपण्याचे आवाहन या गीतातून करण्यात आले. उपस्थित प्रेक्षकांनी या सामाजिक आशयपूर्ण गीताचे उत्स्फूर्त टाळ्यांनी स्वागत केले.

कार्यक्रमात महाराष्ट्रातील विविध सण–उत्सवांची माहिती सादरीकरणाच्या माध्यमातून उलगडली गेली.

# गडसंवर्धन मोहिमेला पंतप्रधानांची दाद !

- रायगड सोहळ्यास उपस्थितीची ग्वाही
- खा. नीलेश लंके यांची संसदेत पंतप्रधान मोदींशी भेट
- कांदा उत्पादकांचे प्रश्न, रेल्वे–महामार्ग व ग्रामसडक योजनेच्या मागण्याही मांडल्या



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर खासदार नीलेश लंके यांनी शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची संसद भवनात भेट घेऊन ऐतिहासिक गड-किल्ल्यांच्या संवर्धनासाठी राबविण्यात येत असलेल्या मोहिमेच्या पहिल्या वर्धापनदिनानिमित्त रायगडावर आयोजित करण्यात आलेल्या सोहळ्याचे आमंत्रण दिले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे साक्षीदार असलेल्या रायगडावर होणाऱ्या या कार्यक्रमास उपस्थित राहण्याची इच्छा व्यक्त करत, शक्य तितक्या प्रमाणात उपस्थित राहण्याची ग्वाही पंतप्रधान मोदी यांनी खा. लंके यांना दिली.या भेटीप्रसंगी खासदार सुप्रिया सुळे, खासदार प्रियंका गांधी तसेच महाराष्ट्रातील इतर खासदार उपस्थित होते. या भेटीदरम्यान पंतप्रधान मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी तसेच गड-किल्ल्यांचे जतन व संवर्धन करण्यासाठी खा. लंके यांनी सुरू केलेल्या मोहिमेचे मनःपूर्वक कौतुक केले. गड-किल्ले हे केवळ दगड-मातीचे अवशेष नसून ते स्वराज्याच्या इतिहासाचे जिवंत प्रतीक असल्याचे सांगत, या मोहिमेमुळे तरुणांमध्ये इतिहासाबद्दल जाणीव आणि अभिमान निर्माण होत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. अशीच लोकसहभागातून चालणारी मोहीम सातत्याने सुरू ठेवावी, असा सल्लाही त्यांनी दिला.

पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत २५० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या अनेक सर्वसाधारण वाड्या-वस्त्या आजही पक्क्या रस्त्यांपासून वंचित असल्याचे निदर्शनास आणून देत, अशा वाड्या-वस्त्यांना तातडीने रस्ते जोडणी करण्याची मागणी खा. लंके यांनी केली. पक्क्या रस्त्यांमुळे शिक्षण, आरोग्य आणि शेतीमालाच्या वाहतुकीला मोठी मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### शेतकरी प्रश्नांवर ठाम भूमिका

खा. लंके यांनी अहिल्यानगर दक्षिण मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांकडे पंतप्रधानांचे लक्ष वेधले. सध्या सुरू असलेली कांद्याची निर्यात सुरूच ठेवण्यात यावी, अन्यथा बाजारपेठेत भाव कोसळून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यासोबतच नाफेड व एनसीसीएफमार्फत शेतकऱ्यांकडून खरेदी करण्यात आलेल्या कांद्याच्या थकीत देयकांमुळे शेतकऱ्यांवर आर्थिक ओझे वाढत असल्याचे सांगत, ही देयके तातडीने अदा करण्याची मागणी त्यांनी केली.


# डॉक्टर्स व केमिस्ट पतसंस्थेच्या चेअरमनपदी डॉ. संजय भळगट यांची निवड

**राहुरी : (समर्थ गांवकरी)**

राहुरी तालुक्यातील अग्रगण्य असलेल्या राहुरी तालुका डॉक्टर्स व केमिस्ट अर्बन को-ऑप क्रेडिट सोसा.लि, राहुरी या पतसंस्थेच्या चेअरमनपदी संस्थेचे जेष्ठ संचालक डॉ. संजय माणिकचंद भळगट यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

संस्थेच्या सभागृहात दि. १६/१२/२०२५ रोजी श्री. एस. के. म्हसे, अधिकारी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कार्यालय, राहुरी यांचे अध्यक्षतेखाली चेअरमन निवडीची प्रक्रिया पार पडली. संस्थेच्या चेअरमनपदी डॉ. संजय भळगट यांचे नावाची सूचना संचालक डॉ. सोपान एकनाथ हारदे यांनी मांडली आणि डॉ. दत्तात्रय सहदेव वने यांनी अनुमोदन दिले.

चेअरमनपदी निवड झाल्यानंतर बोलताना डॉ. भळगट यांनी सांगितले की, डॉक्टर्स व केमिस्ट पतसंस्था ही अत्यंत नावाजलेली संस्था असून, संस्थेच्या संचालक मंडळाने गेली सतत २५ वर्षे सभासदांना १५% लाभांश दिलेला आहे. संस्थेचा कारभार पाहताना पारदर्शकता राखणे तसेच तत्पर व विनयशील सेवा देणे यास प्राधान्य राहील. संस्थेचे संचालक मंडळाचे सहकार्याने कर्ज थकबाकी कमी करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करू आणि त्याचबरोबर सोनेतारण कर्ज वितरणासाठी विविध योजना राबवू असेही त्यांनी सांगितले.



सभेच्या शेवटी व्हा. चेअरमन डॉ. विलास रामराव पाटील यांनी आभार मानले. सभेसाठी डॉ. विलास पाटील, डॉ. दत्तात्रय वने, डॉ. चंद्रकांत गिरगुने, डॉ. सोपान हारदे, श्री. सुर्यकांत भुजाडी, डॉ. महेश कोहकडे, डॉ. संजय म्हसे, डॉ. सौ. हेमा वैरागर, सौ. जयश्री मोटे व सचिव श्री. बाबासाहेब शिंगोटे उपस्थित होते.

# धुमाळ विद्यालयातील विद्यार्थीची पुणे विभाग स्तरीय व राज्य स्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी निवड

**राहुरी : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालय आयोजित शालेय जिल्हास्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेत लोकनेते रामदास पाटील धुमाळ कला विज्ञान व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय 17 वर्ष वयोगट मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावत पुणे विभाग स्तरावर निवड झाली तर 19 वर्षे मुलांच्या संघाने जिल्हास्तरीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकवला.

अहिल्यानगर टेनिस क्रिकेट असोसिएशन आयोजित जिल्हास्तरीय स्पर्धेतून सहा खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.



या गुणवंत खेळाडूंचे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉक्टर अनिता वेताळ, उपप्राचार्य डॉक्टर राजेंद्र गोसावी,कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य उन्हे मंजाबापू,कार्यालयीन प्रबंधक गणेश देशमुख, वरिष्ठ लिपिक प्रफुल तनपुरे,कार्यालयीन सेवक संदीप भांड, अशोक बिगडगर,संजय गुलदगड यांनी कौतुक केले.

17 वर्षे मुले - गाडे चैतन्य सचिन,शेख साद फारुख, भोंगळ हर्षद अशोक, पठाण अन्वर समीर, आढाव अमृत सोपान, थोरात विठ्ठल शिवाजी, दरंदले अथर्व अनिल, सय्यद समद समीर, बाचकर तुषार शिवाजी, बाचकर ऋषिकेश भाऊसाहेब, सोळसे अजय अप्पासाहेब, बलसाने प्रथमेश दीपक, शिंदे साईराज प्रवीण, लाड दीपक अशोक, बर्डे अजिंक्य सिताराम, शेख सुभान अकबर, भामरे हर्ष राजेंद्र, संकेत बाबासाहेब पडागळे, भागवत आदित्य मंगेश इत्यादी खेळाडूंचा समावेश होता.

या गुणवंत खेळाडूंना श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माननीय श्री अरुण बाबुराव तनपुरे पाटील तसेच संस्थेचे उपाध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर भास्कर कोळसे पाटील व जनरल सेक्रेटरी श्री. हर्षदादा अरुण तनपुरे पाटील यांनी कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या खेळाडूंची पुणे विभागीय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली तर सहा खेळाडूंची राज्यस्तरावर निवड झाली. अशी माहिती कनिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडा संचालक श्री.संतोष रामदास बर्डे यांनी दिली.

# निवडणूक प्रभारी पदी आमदार निरंजन डावखरे

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या आदेशानुसार आगामी स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर ठाणे महानगरपालिकेसाठी निवडणूक प्रभारी म्हणून कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार ॲड. निरंजन डावखरे यांची अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनात्मक अनुभव, समन्वय कौशल्य आणि निवडणूक व्यवस्थापनातील सक्षम नेतृत्व लक्षात घेता ही जबाबदारी त्यांच्याकडे सोपवण्यात आली असून भारतीय जनता पक्षाचे जास्तीत जास्त उमेदवार विजयी करण्यासाठी ते सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन प्रभावीपणे कार्य करतील असा विश्वास प्रदेशाध्यक्षांनी व्यक्त केला आहे.

# माळेगाव यात्रेत आरोग्याचा जागर; भव्य आरोग्य प्रदर्शनीचे उद्‌घाटन



**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

सुप्रसिद्ध श्रीक्षेत्र माळेगाव यात्रेला यंदा मोठ्या उत्साहात सुरुवात झाली आहे. या यात्रेच्या पार्श्वभूमीवर जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य आरोग्य प्रदर्शनीचे उद्‌घाटन कंधार-लोहा विधानसभा क्षेत्राचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आले. ही आरोग्य प्रदर्शनी २५ डिसेंबर पर्यंत भाविकांसाठी खुली राहणार आहे. या आरोग्य प्रदर्शनीमध्ये शासनाच्या विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची माहिती देणारे आकर्षक स्टॉल्स, बॅनर्स व पोस्टर्स उभारण्यात आले आहेत. तळागाळातील नागरिकांपर्यंत आरोग्यविषयक माहिती पोहोचवणे व जनजागृती करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत भाविकांना शासकीय योजनांचे लाभ, प्रतिबंधात्मक उपाय तसेच आरोग्य शिक्षणाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे. या प्रदर्शनीत माहितीबरोबरच मोफत आरोग्य तपासणी सुविधाही उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामध्येसिकलसेल तपासणी, सीवाय-टीबी तपासणी, एचआयव्ही तपासणी, विविध प्रकारच्या रक्त तपासण्या केल्या जात आहेत. यासोबतच फ्लिपचार्ट, घडीपत्रिका व माहितीपत्रकांच्या माध्यमातून नागरिकांचे आरोग्यविषयक समुपदेशन करण्यात येत आहे. या आरोग्य प्रदर्शनीचे विशेष आकर्षण म्हणजे कलापथक.

आरोग्य विषयांवर आधारित पथनाट्य व गीतांच्या माध्यमातून हजारो भाविकांमध्ये मनोरंजनातून प्रबोधन करण्यात येत असून, या उपक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

### प्रशासकीय नियोजन व मान्यवरांची उपस्थिती

या उपक्रमाचे नियोजन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख यांनी केले असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाची टीम प्रभावीपणे कार्यरत आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली ही आरोग्य प्रदर्शनी राबविण्यात येत आहे. माळेगाव यात्रेत येणाऱ्या लाखो भाविकांनी या आरोग्य प्रदर्शनीचा लाभ घ्यावा व आपल्या आरोग्याबाबत जागरूक राहावे,असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख यांनी केले आहे.



# दिव्यातील प्रभाग क्र २७ मधील शिवसेनेचे उमेदवार जाहीर

**ठाणे, दिवा : (समर्थ गांवकरी)**

ठाणे महानगरपालिका हद्दीतील वाढत्या लोकसंख्येच्या दिवा शहरात शिवसेनेच्या माध्यमातून अनेक कामे मार्गी लागली असून अनेक प्रलंबित कामं पूर्ण करण्यासाठी शिवसेना शिंदे गटाने यंदाच्या पालिका निवडणुकीसाठी पुन्हा विद्यमान व तगडे उमेदवार जाहीर केल्याची प्राथमिक माहिती मिळाली असून यंदाची ठाणे महापालिका निवडणूकित महायुतीचे उमेदवार मैदानात उतरणार आहेत. दिवा विभागात प्रभाग २७, २८ व २९ चा समावेश होतो. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या आदेशानुसार व दिवा शहरप्रमुख तथा मा. उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या मार्गदर्शनानुसार प्रभाग क्र. २७ मध्ये विद्यमान नगरसेवक शैलेश पाटील, अमर पाटील, सौ. दीपाली उमेश भगत तसेच उपशहर प्रमुख ॲड. आदेश भगत यांची उमेदवारी जवळपास निश्चित करण्यात आली असून येत्या रविवारी २१ डिसेंबर २०२५ पासून प्रचाराचा नारळ फुटणार असल्याची सूत्रांकडून माहिती मिळाली आहे.

### दिव्यात शिवसेनेचे पारडे जड

दिवा शहरात विद्यमान मा. नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांना तिसऱ्यांदा निवडणुकीच्या रींगणात उतरणार असून त्यांनी त्यांनी प्रभाग समिती अध्यक्षपद देखील भूषविले आहे. विद्यमान नगरसेवक अमर ब्रम्हा पाटील देखील आपल्याला प्रभागातील कामे मार्गी लावण्यात यशश्वि झाल्याने पुन्हा निवडणूक रींगणात उतरणार असून मा. नगरसेविका सौ दीपाली उमेश भगत यांनी आपल्या प्रभागातील व महिलांसाठी केलेल्या कार्याची पोहचपावती म्हणून पुन्हा उमेदवारी मिळविण्यात त्या यशश्वि झाल्या आहे. तर दिवा रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष असलेले ॲड. आदेश कमलाकर भगत यांना प्रभाग २७ मधील उमेदवारी जाहीर झाली आहे.

# माळेगाव यात्रेत आज शेतकऱ्यांचा भव्य सत्कार

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

श्रीक्षेत्र माळेगाव, मीडिया सेंटर, दि. 19 डिसेंबर :- श्रीक्षेत्र माळेगाव येथे नांदेड जिल्हा परिषद कृषी विभागाच्या वतीने उत्कृष्ट शेती करणाऱ्या व आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणाऱ्या शेतकऱ्यांचा डॉ. शंकरराव चव्हाण कृषिनिष्ठ शेतकरी पुरस्कार देऊन आज शनिवार दिनांक 20 डिसेंबर रोजी भव्य सत्कार करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील निवडक 16 उत्कृष्ट शेतकऱ्यांचा सपत्नीक गौरव सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमास हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

# अध्यक्षपदी संपत गीते यांची बिनविरोध निवड

**ठाणे:कल्याण : (समर्थ गांवकरी)**

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण च्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या "छत्रपती शिक्षक सेवक वर्ग सहकारी पतपेढीच्या 2025-30 च्या पंचवार्षिक निवडणूकीत अध्यक्ष पदी अभिनव विद्या मंदिर चे मुख्याध्यापक संपत गीते यांची बिनविरोध निवड करण्यात आली उपाध्यक्ष मिताली बोकील कोषाध्यक्ष प्रमोद पाटील, सचिव संगिता आंबेरकर तर

संचालक म्हणून शरद देवरे, उर्मिला जाधव, नितूशा हेडावू ,सुलभा परदेशी, कांचन माळी, सुनिल जाधव दिपक पाटील दिलीप भोईर सुरेश गावित,दिपक गावडे, हिरालाल जाधव हे बिनविरोध निवडून आले.

गिते यांच्या निवडीबद्दल मुख्याध्यापक संघटनेचे अध्यक्ष अनिल बोरनारे यांनी सत्कार केला.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मोहन सरक व सहाय्यक निवडणूक अधिकारी किशोर येवले यांनी काम पाहिले तसेच छत्रपती शिक्षण मंडळाचे कार्यकारणी सदस्य मिलिंद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवडणूक प्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली. निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.



यावेळी नवनिर्वाचित अध्यक्षांनी आपल्या मनोगतात सांगितले की संस्थेच्या सभासदांचा विश्वास अधिक दृढ करत पारदर्शक कारभार व सभासद हीत आणि संस्थेचे आर्थिक प्रगती हेच आमचे प्रमुख ध्येय राहील .

छत्रपती शिक्षक सेवक वर्ग सहकारी पतपेढीची स्थापना 14 जून 1979 रोजी झाली असून आतापर्यंत 1020 सभासद होते. सद्यस्थितीत 381 सभासद असून वार्षिक उलाढाल 9 कोटींहून अधिक रुपयाची आहे पतपेढीच्या ठाणे पालघर व रायगड येथे शाखा आहेत.

# सहा महापालिकांसाठी शिवसेनेतून ३३४८ इच्छुक

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

शिवसेनेचा बालेकिल्ला असलेल्या ठाणे जिल्ह्यातील सहा महापालिकांच्या निवडणुकीत शिवसेनेतून उमेदवारी मिळावी, यासाठी ३३४८ इच्छुकांनी मुलाखतीचे अर्ज भरले आहेत. यात १५४८ महिलांनी उमेदवारी मिळावी यासाठी अर्ज केला आहे. ठाणे जिल्ह्यातल्या महापालिकांमधील इच्छुकांच्या मुलाखतीचा कार्यक्रम शनिवारपासून सुरु होणार आहे. महापालिकांमधील सदस्य संख्येच्या चार ते पाचपट इच्छुक असल्याने उमेदवारांचा कस लागणार आहे. महापालिका निवडणूक जाहीर झाल्यानंतर शिवसेनेकडून इच्छुकांच्या मुलाखतींची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. ठाणे जिल्ह्यात उल्हासनगर, कल्याण डोंबिवली, ठाणे, नवी मुंबई, भिवंडी निजामपूर, मीरा भाईंदर या सहा महापालिकांचा समावेश आहे.



मागील चार दिवसांत या सहा महापालिकामधील एकूण ६१८ सदस्य पदांसाठी शिवसेना पक्ष कार्यालयातून ३३४८ इच्छुकांनी मुलाखतीचे अर्ज सादर केल्याची माहिती खासदार नरेश म्हस्के यांनी दिली. मुंबई महापालिकेप्रमाणेच ठाणे जिल्ह्यातील सर्वच महापालिकांमध्ये उमेदवारीसाठी इच्छुकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला असल्याचे खासदार म्हस्के म्हणाले.

# वर्षानुवर्षांचे शेतकऱ्यांचे हेलपाटे थांबणार – शरद पवळे

### पारनेर भूमीअभिलेखमधील प्रलंबित २१४ प्रकरणांसाठी ८४ अधिकाऱ्यांची नेमणूक

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यातील शेतरस्त्यांच्या वर्षानुवर्षे प्रलंबित प्रश्नांना अखेर गती मिळाली असून, तब्बल २१४ शेतरस्ता मोजणी प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी ८४ अधिकाऱ्यांची विशेष नियुक्ती करण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र राज्य शिवपानंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी दिली.

शिवपानंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे व सुरेश वाळके यांनी दिनांक १८ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हा प्रशासनाकडे निवेदन सादर करून, पारनेर तालुक्यात शेतकरी शेतरस्त्यांच्या प्रश्नासाठी वारंवार भूमी अभिलेख कार्यालयात हेलपाटे मारत असूनही त्यांना न्याय मिळत नसल्याची तीव्र व्यथा मांडली होती. या निवेदनाची गंभीर दखल घेत जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख संजय कुंभार यांनी उपअधीक्षक भूमी अभिलेख, पारनेर यांना तातडीचे व स्पष्ट निर्देश दिले आहेत.




या आदेशानुसार पारनेर तालुक्यातील सर्व प्रलंबित शिवपानंद शेतरस्त्यांच्या प्रकरणांचा सखोल आढावा घेऊन विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. कोणतेही मोजणी प्रकरण प्रलंबित राहू नये, याबाबत दक्षता घेण्याचे आदेश देण्यात आले असून, मोजणी पूर्ण झालेल्या प्रकरणांचा सविस्तर अहवाल महसूल विभागाकडे सादर करण्यात येणार आहे.

दरम्यान, दिनांक २० डिसेंबर २०२५ रोजी जिल्ह्यातील ८४ कर्मचाऱ्यांच्या सेवेतून पारनेर तालुक्यात विशेष मोहीम राबविण्यात येणार असून, २१४ प्रलंबित शेतरस्ता मोजणी प्रकरणांचा निपटारा करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. याबाबत उपअधीक्षक भूमी अभिलेख, पारनेर यांना आवश्यक सूचना देण्यात आल्याचेही प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

या निर्णयामुळे पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून, शेतरस्त्यांचा प्रश्न लवकरच मार्गी लागेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. पुढील काळात उर्वरित प्रकरणांसाठीही सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू ठेवून 'झिरो पेंडन्सी' अभियान यशस्वी करण्याचा निर्धार असल्याचे शरद पवळे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले. भविष्यात कोणत्याही शेतकऱ्याला वारंवार हेलपाटे मारावे लागू नयेत, यासाठी सक्षम अधिकारी व कर्मचारी नियुक्तीसाठी पाठपुरावा सुरूच राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

पारनेर तालुक्यातूनच शिवपानंद शेतरस्ता चळवळीची क्रांतीची ज्योत पेटली आणि ती राज्यभर पसरली. "शेत तिथे रस्ता गाव तिथे समृद्धी" या नाऱ्याने जनजागृती, जनआंदोलन आणि न्यायालयीन लढ्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यात आला. "माझा रस्ता होवो न होवो, पण शेवटच्या भावाला दर्जेदार शेतरस्ता मिळालाच पाहिजे" या संकल्पातून संघटन मजबूत झाले. चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा सन्मान आणि शेतकऱ्यांना वेठीस धरणाऱ्यांविरोधात न्यायालयीन लढा देत, ७० वर्षांनंतर राज्यात शेतरस्त्यांचा ऐतिहासिक मार्ग मोकळा झाला. काही ठिकाणी झालेल्या दुर्लक्षाची भरपाई करण्याचा निर्धार आजही कायम आहे.

**- शरद पवळे ( प्रणेते, महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळ)**

## लहान-लोण येथे बौद्ध धम्म परिषदच्या पूर्वतयारी बैठकीचे आयोजन



**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण प्रसारक संस्था, लोण (खु.) व तपोवन बुद्ध विहार, लहान-लोण यांच्या संयुक्त विद्यमाने २३ वी अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद २०२६ चे भव्य आयोजन लहान-लोण येथे करण्यात येणार आहे. या परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी दि २१ डिसेंबर २०२५ रोजी रविवार दुपारी १ वाजता पूर्वतयारी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद ८ व ९ फेब्रुवारी २०२६ या दोन दिवशी होणार असून देशभरातून बौद्ध अनुयायी, भिक्खू संघ, अभ्यासक व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

या परिषदेमुळे धम्माचा प्रचार व प्रसार, सामाजिक समता, बंधुता, शिक्षण व सांस्कृतिक मूल्यांचा प्रसार साधला जाणार आहे. तपोवन बुद्धभूमी महाविहार, लहान लोण येथे आयोजित या परिषदेमागे धम्मनिष्ठ नेते दलितमित्र कालवश निवृत्तीराव लोणे यांच्या अथक परिश्रमातून साकार झालेल्या या तपोवन बुद्धभूमीची स्थापना व त्यांच्या विचारांचा प्रभाव आहे. त्यांनी आयुष्यभर धम्मकार्य, शैक्षणिक, सामाजिक प्रबोधन व संघटनासाठी दिलेल्या योगदानाची प्रेरणा घेऊन ही परिषद साकारली जात आहे. परिषदेत भगवान बुद्धांचे तत्त्वज्ञान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आदर्श व विचार समाजापर्यंत पोहोच विण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

पूर्वतयारी बैठकीत परिषदेसाठी आवश्यक नियोजन, समित्यांची रचना, कार्यक्रमांची आखणी, पाहुण्यांचे स्वागत, निवास-भोजन, सुरक्षा, स्वयंसेवक व्यवस्था आदी विषयांवर सविस्तर चर्चा होणार आहे. या बैठकीला पंचशील, प्रज्ञा, करुणा व समता या मूल्यांवर आधारित मार्गदर्शन होणार असून विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या धम्म परिषदेच्या पुर्व तयारी बैठकीस महाउपासक. एस.पी. गायकवाड व परिषदेचे स्वागताध्यक्ष, नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती. संजय देशमुख लहानकर, हे उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती धम्मपरिषदेचे आयोजक अनुसयाबाई निवृत्ती लोणे परिषदेचे संयोजक राजेश लोणे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.




संगमनेर : श्रमशक्ती कृषी महाविद्यालय मालाड येथील कृषी कन्यांचे कासारा दुमाला या गावात पुढील तीन महिन्यांसाठी वास्तव्यास असणार असून येथील शेतकऱ्यांना विविध कृषी विषयक मार्गदर्शन करणार असल्याची माहिती सरपंच राजेंद्र त्रिभुवन यांनी दिली. या कृषीकन्याचे ग्रामपंचायत व शेतकऱ्यांच्या वतीने स्वागत करण्यात आले. सेवा संस्कार संस्थेच्या अंतर्गत श्रमशक्ती कृषी महाविद्यालय मालदाड येथे ह्या विद्यार्थिनी शिक्षण घेत आहे. संस्थेचे संस्थापक साहेबराव नवले प्राचार्य डॉ. आर .एस. हापसे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम समन्वय प्रो. एन. तायडे कार्यक्रम अधिकारी प्रो. ए.डी. गुंजाळ, प्रो. के.शिंदे. यांच्या यांच्या सूचनेनुसार कु. मोरे पूजा ,कु. साबळे ऋचिरा ,कु. गाजरे वृषाली, कु. कानवडे अनुजा, कु. महाजन समृद्धी या कासारा दुमाला येथील शेतकऱ्यांचे अनुभव जाणून घेत त्यांना मार्गदर्शन करणार आहे.

## थोडक्यात बातम्या...




### डॉ. विश्वास आरोटे यांचा सामाजिक उपक्रम

अकोले (स. गांवकरी) : रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या पादुका दर्शन सोहळ्यानिमित्त अकोले येथे भाविक भक्तांसाठी भोजन व्यवस्थेसाठी सेवेकऱ्यांना तांदळाची पोती प्रदान करण्यात आली. हा सामाजिक उपक्रम महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी सेवेकऱ्यांनी केलेल्या सेवाभावी कार्याचे कौतुक करण्यात आले असून, भाविकांच्या अन्नदान सेवेला या मदतीमुळे मोठा आधार मिळणार आहे.

### पुनम काकडे हीस अस्मिता खेलो इंडिया वेटलिफ्टिंग स्पर्धेत सुवर्ण पदक



पाथर्डी (स. गांवकरी) : बाबुजी आव्हाड कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. पूनम काकडे हिने कोटा, राजस्थान येथे झालेल्या पश्चिम विभाग अस्मिता खेलो इंडिया वुमेन्स वेटलिफ्टिंग लीग स्पर्धेत ६९ किलो वजन गटात १७० किलो वजन उचलून युथ वयोगटात सुवर्णपदक तर सिनियर वयोगटात रौप्य पदक पटकावले.

## प्रा. राम शिंदे यांच्या सभापतीपदाची वर्षपूर्ती

■ डॉ. विश्वासराव आरोटे कळसुबाई शिखरावरून.

(समर्थ गांवकरी)



नगर जिल्ह्यातील चौंडी (ता. जामखेड) या गावाचे सुपुत्र व महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या सभापतीपदाची वर्षपूर्ती शुक्रवार, १९ डिसेंबर २०२५ रोजी होत आहे. विधान परिषद सभागृहाने १९ डिसेंबर २०२४ रोजी एकमताने त्यांची निवड केली होती. या एका वर्षाच्या कालखंडात त्यांनी घेतलेले निर्णय, सभागृह संचालनाची पद्धत आणि लोकशाही मूल्यांना दिलेले बळ यांचा आढावा घेणे महत्त्वाचे ठरते. प्राध्यापक असल्याने शिस्त, नियमांचे काटेकोर पालन आणि वेळेचे भान हे गुण त्यांच्या अध्यक्षतेखालील कामकाजात ठळकपणे दिसून येतात. त्यामुळेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचा "हेडमास्तर" असा आदरयुक्त उल्लेख केला. सभापतीपदी निवडीनंतर मुख्यमंत्री व सर्वपक्षीय सदस्यांनी त्यांचे अभिनंदन करत अपेक्षाही व्यक्त केल्या.

क्यू–बी–बी–सी : विधानपरिषदेसाठी चतुःसूत्री दृष्टी:

सभापती प्रा. शिंदे यांनी कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी क्यू–बी–बी–सी ही चतुःसूत्री मांडली—

1. क्यू – प्रश्नोत्तराचा तास : जास्तीत जास्त प्रश्न पुकारून लोकहिताचे मुद्दे पुढे आणणे.
2. बी – विधेयके : "No Bill Should Be Passed Without Discussion" या तत्त्वावर सखोल चर्चा व विचारमंथन.
3. बी – अर्थसंकल्पीय प्रक्रिया : बजेट चर्चेत सदस्यांचा सक्रिय सहभाग वाढवणे.
4. सी – समित्या : समिती पद्धती अधिक प्रभावी करून लोकशाहीचा आत्मा बळकट करणे.

या धोरणांचे सकारात्मक परिणाम अधिवेशनांत स्पष्टपणे दिसून आले. सभागृह सुरू होण्यापूर्वी सर्वपक्षीय गटनेत्यांच्या नियमित बैठका घेण्याचा शिरस्ता सुरू झाल्याने समन्वय व सौहार्द वाढले.

डिजिटल सुधारणा आणि राष्ट्रीय पातळीवरील सहभाग : पेपरलेस डेमोक्रसी, वन नेशन–वन प्लॅटफॉर्म आणि कायदा निर्मितीत जनसहभाग वाढवण्याची संकल्पना लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी मांडली होती. ही संकल्पना महाराष्ट्रात प्रत्यक्षात आणण्यासाठी सभापती प्रा. राम शिंदे आणि विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी संयुक्त पुढाकार घेतला.

पाटणा येथे झालेल्या ८५व्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेत त्यांनी "भारतीय राज्यघटनेची ७५ वर्षे : घटनात्मक मूल्यांच्या बळकटीसाठी संसद व राज्य विधिमंडळांचे योगदान" या विषयावर विचारमंथनात सहभाग घेतला. यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संसदीय कारकीर्दीचा प्रारंभ बॉम्बे लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमधून झाल्याचा अभिमान त्यांनी व्यक्त केला.

शतक महोत्सव, अभ्यासवर्ग आणि ऐतिहासिक निर्णय : विधानपरिषद शतक महोत्सवानिमित्त द्वितीय ग्रंथाचे प्रकाशन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. तसेच नवनिर्वाचित सदस्यांसाठी संसद भवन, नवी दिल्ली येथे प्राईड संस्थेमार्फत दोन दिवसीय संसदीय अभ्यासवर्ग आयोजित करण्यात आला. एक वर्षाच्या कालावधीत सभापती प्रा. राम शिंदे यांनी शिस्तबद्ध संचालन, संवादात्मक वातावरण, डिजिटल सुधारणा आणि लोकशाही मूल्यांचे संवर्धन यांचा ठसा उमटवला आहे. त्यांच्या पुढील कारकीर्दीस हार्दिक शुभेच्छा!.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी वर्ष

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी वर्षानिमित्त अर्थसंकल्पीय अधिवेशनात जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून अभिवादन प्रस्ताव मांडण्यात आला. याच पुढाकारातून ०६ मे २०२५ रोजी चौंडी (ता. जामखेड) येथे राज्य मंत्रिमंडळाची बैठक आयोजित करण्यात आली—राज्याच्या इतिहासातील ही पहिलीच घटना ठरली. चौंडी हे तीर्थक्षेत्र व पर्यटन केंद्र म्हणून जागतिक पातळीवर नावारूपाला येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## चेन्नई डाय कास्टिंग कारखान्याच्या विस्तारासाठी

### जय हिंद इंडस्ट्रीजकडून भूमीपूजन समारंभाचे आयोजन



**पुणे/चेन्नई : (समर्थ गांवकरी)**

जागतिक दर्जाच्या उत्पादन निर्मिती क्षमता असलेली आणि प्रिसिजन ॲल्युमिनियम डाय-कास्ट घटकांची आघाडीची जागतिक पुरवठादार असलेल्या जय हिंद इंडस्ट्रीजने (जेएचआय) चेन्नई उत्पादन सुविधेच्या विस्तारासाठी भूमिपूजन समारंभ आयोजित केला होता. त्यामुळे कंपनीची भारतातील प्रगत उत्पादन, क्षमता वाढ आणि भविष्यासाठी तयार क्षमतांबद्दलची दीर्घकालीन वचनबद्धता पुन्हा स्पष्ट झाली. तामिळनाडूमधील तिरुवल्लूर जिल्ह्यातील कोट्टैयुर गावातील औद्योगिक क्षेत्रात स्थित, विस्तारित सुविधा सुमारे २०० कोटी रूपयांच्या गुंतवणूकीसह विकसित केली जात आहे. या विस्तारात १४०० ते ४,४०० टनांपर्यंतच्या हाय प्रेशर डाय कास्टिंग (एचपीडीसी) मशीन्स असतील. त्यामुळे पारंपरिक अंतर्गत ज्वलन इंजिन भागांपासून ते ईव्ही घटक आणि मोठ्या स्ट्रक्चरल कास्टिंगपर्यंत विविध घटकांचे उत्पादन शक्य होईल. या वाढीसाठी उपयुक्त ठरणारे सुमारे १३,००० चौरस मीटर क्षेत्रफळाचे एक नवीन शेड बांधण्याचे नियोजन केले जात आहे. पूर्ण झाल्यावर त्यात विस्तारित मशीन क्षमतेसह प्रगत डाय-कास्टिंग मशीन्स असतील. त्यामुळे प्लांट पूर्णपणे अनुलंब एकात्मिक उत्पादन सुविधा म्हणून काम करू शकेल.

## कोकणातील पत्रकारांची लेखणी राज्यविकासाला गती देणारी – डॉ. विश्वासराव आरोटे



**अकोले : (समर्थ गांवकरी)**

कोकण विभागातील पत्रकारांनी राज्याच्या राजकारणात व समाजकारणात आपल्या लेखणीच्या माध्यमातून निर्माण केलेली ओळख निश्चितच राज्याच्या विकासाला गतिमान करणारी आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी केले.

रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पत्रकारांनी सर्वसामान्य जनतेचे प्रश्न शासनदरबारी प्रभावीपणे मांडण्याचे कार्य केले आहे. त्याचबरोबर राज्याला कोकणाचा समृद्ध इतिहास समाजासमोर आणण्याचे महत्त्वपूर्ण योगदानही या पत्रकारांकडून होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

नुकतेच रत्नागिरी–सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पत्रकारांनी शिर्डी साईबाबा व दगडूशेठ हलवाई गणपती दर्शनानिमित्त दैनिक समर्थ गांवकरी कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. यावेळी साईबाबांची मूर्ती, शाल, पुष्पगुच्छ व हरिपाठ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पत्रकारांचे प्रतिनिधित्व साई राऊळ, रुपेश हिराप व क्रिश सावंत यांनी केले.

कार्यक्रमात युवा पत्रकार व नामवंत उद्योजक प्रसन्न गोंदवले यांनी आपल्या वाणी व लेखणीच्या माध्यमातून सामाजिक कार्यात निर्माण केलेली ओळख अधोरेखित करण्यात आली. प्रेरणादायी पत्रकारितेत त्यांनी 'पत्रकारितेतील सचिन तेंडुलकर' अशी ओळख निर्माण केली असल्याचे गौरवोद्गार यावेळी काढण्यात आले.

कोकणातील पत्रकारांची ही वाटचाल राज्यातील पत्रकारितेला नवी दिशा देणारी असून समाजहितासाठीची त्यांची बांधिलकी अधिक दृढ करणारी असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/१३२/२०२५ अकोले दि. १९/१२/२०२५

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री.ज्ञानेश्वर लक्ष्मण धरणे, रा. घाटघर**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **यांचा मुलगा कु.साक्षर ज्ञानेश्वर धरणे याचा जन्म दि. ०८/०५/२०२१ रोजी घाटघर** येथे झाला असल्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालय **घाटघर**, ता. अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री.ज्ञानेश्वर लक्ष्मण धरणे, रा. घाटघर**, ता.अकोले, जि. अहिल्यानगर **यांचा मुलगा कु. साक्षर ज्ञानेश्वर धरणे याचा जन्म दि. ०८/०५/२०२१ रोजी घाटघर** येथे झाला आहे. सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **घाटघर**, ता.अकोले, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. १९/१२/२०२५ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

**हुकूमावरुन,**

**कामगिरी क्लर्क** **तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

## जाहीर प्रकटन

**अकोले नगरपंचायत अकोले**

**ता. अकोले, जि. अहिल्यानगर**

अ.न.पं.जा.क्र. आरोग्य/जाहिरात/४६९/२०२५ दि. १९/१२/२०२५

तमाम लोकांना मौजे अकोले (माळीझाप बनकर वस्ती) ता. अकोले, जि. अहिल्यानगर येथील तमाम नागरिकांना कळविण्यात येते की, ज्याअर्थी **श्री. सागर दत्तात्रय बनकर, मौजे अकोले (माळीझाप बनकर वस्ती), ता. अकोले** यांचा दिनांक २४.११.२०२५ रोजीचा अर्ज नगरपंचायत अकोले कार्यालयाकडे प्राप्त झालेला आहे.

अर्जदार यांनी नमूद केलेप्रमाणे स.न. २३४/१ मध्ये नव्याने **कुक्कुटपालन व्यवसाय** सुरु करण्यासाठी नगरपंचायत कार्यालयाकडून **ना–हरकत प्रमाणपत्राची मागणी** केली आहे.

उपरोक्त अर्जाबाबत कोणत्याही नागरिकांना हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत लेखी स्वरुपात नगरपंचायत अकोले कार्यालयाकडे सादर करावी. हरकत नोंदविण्याची मुदत या जाहीर प्रकटनाच्या प्रसिध्दीपासून **७ दिवसांच्या आत** राहील.

निर्धारित मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदारास ना–हरकत प्रमाणपत्र देण्यात येईल.

कळावे,

**मुख्याधिकारी**

**अकोले नगरपंचायत अकोले**

## सौ. नीलिमा कातोरे प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त




**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा येथील श्रीमंत राजमाता विजया राजे शिंदे कन्या विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका सौ. नीलिमा बबन कातोरे या आपल्या प्रदीर्घ व आदर्श शैक्षणिक सेवेनंतर ३१ डिसेंबर २०२५ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित गौरव सोहळा रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य मा. श्री बाबासाहेब भोस यांच्या अध्यक्षतेखाली विद्यालयाच्या सभागृहात उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री मा. बबनरावजी पाचपुते, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मा. श्री दादाभाऊ कळमकर, उत्तर विभागाचे विभागीय अधिकारी श्री नवनाथ बोडखे, जनरल बॉडी सदस्य मा. श्री ज्ञानदेव पांडुळे, मा. श्री कुडलिकराव दरेकर, माजी पोलीस आयुक्त श्री अनिल घनवट, श्री अजित घनवट, श्री भास्करराव घनवट, श्री बबनराव कातोरे, श्री मनोहर सातपुते, श्री तुकाराम कण्हेरकर, लाईफ वर्कर श्री राजेंद्र खेडकर आदी मान्यवर उपस्थित होते.

याशिवाय पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष मा. श्री पीटर रणसिंग, रयत बँकेचे संचालक श्री दिलीपराव तुपे, श्री प्रशांत खामकर, स्कूल कमिटीच्या सदस्या रत्नप्रभा बोरुडे व ज्योत्स्ना भंडारी, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा श्रीम. अश्विनी रणसिंग, सदस्या वर्षा ढवळे व अशा कुदळे, श्री प्रकाश बोरुडे, कामरगावचे सरपंच संदीप ढवळे, माजी सरपंच श्री वसंतराव ठोकळ, श्री गणेश साठे, प्राचार्य मनोहर करांडे, भाऊसाहेब औटी, दिलीप भुजबळ, वसंतराव दरेकर, संपतराव पवार, श्री धीरज पानसंभळ, श्री सुरज कडुसकर आदींनी उपस्थित राहून सौ. कातोरे यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी विद्यालयाच्या वतीने श्री बबनराव कातोरे व सौ. नीलिमा कातोरे यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीम. वर्षा भोईटे यांनी केले. सूत्रसंचालन श्री प्रशांत चव्हाण व गुरुकुल प्रमुख श्री किरण शिंदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री बाळासाहेब शिंदे यांनी मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# समर्थ विधी विद्यालयाचा विद्यार्थी मार्गदर्शन मेळावा संपन्न

## राष्ट्रीय व जागतिक स्तरावर स्पर्धेसाठी कायद्याचे शिक्षण इंग्रजीत घ्या : ॲड. अहमद खान पठाण

**बेल्हे : (समर्थ गांवकरी)**



समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ विधी महाविद्यालय,बेल्हे येथे नुकताच नवोदितांचा सत्कार व मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न झाला. समर्थ विधी महाविद्यालय आणि जुन्नर तालुका वकील बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ॲड.पठाण यांची महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल हा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे अध्यक्ष ॲड.अहमद खान पठाण म्हणाले की,राष्ट्रीय आणि जागतिक पातळीवर प्रभावीपणे स्पर्धा करण्यासाठी कायद्याचे शिक्षण इंग्रजी भाषेत घ्यावे.तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक व व्यावसायिक प्रगतीसाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) हे एक उपयुक्त साधन म्हणून स्वीकारावे. महिला आरक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी बार कौन्सिल ऑफ इंडियामध्ये ३० टक्के महिला प्रतिनिधित्व लागू होणार असल्याचे सांगितले. त्यामुळे भविष्यात विद्यार्थिनींनी बीसीआय निवडणुकांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन नेतृत्वाची भूमिका बजवावी,असे आवाहन त्यांनी केले.ॲड.पठाण यांनी आपला जीवनप्रवास उलगडला.ते म्हणाले, “मी एका शेतकरी कुटुंबातून आलो असून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतले.शिवजन्मभूमी जुन्नरचा सुपुत्र असल्याचा मला अभिमान आहे.मी शिवनेरीचा मावळा असून माझ्या तालुक्यातील विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी आलो आहे.” ग्रामीण भागात समर्थ विधी महाविद्यालय सुरू झाल्यामुळे कायद्याचे शिक्षण विद्यार्थ्यांना जवळच उपलब्ध झाले आहे असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव विवेक शेळके होते.प्रास्ताविका मध्ये प्राचार्य डॉ.सुनील कवडे यांनी महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांची,शैक्षणिक प्रगतीची व संस्थेने शिक्षण क्षेत्रात घेतलेल्या वाटचालीची माहिती दिली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. सचिन दरेकर यांनी करून दिला. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष ज्ञानेश्वर शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके,जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या स्नेहलताई शेळके,कॅम्पस डायरेक्टर राजीव सावंत,तसेच जुन्नर तालुका वकील बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.शिवदास तांबे,उपाध्यक्ष ॲड.अजीज शेख,ॲड.सुधीर कोकाटे,ॲड.मिथिलेश शिंदे,नूतन शेगर,तसेच वकील व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.ॲड.सोनिया बोगावत यांनी केले तर आभार प्रा. शिवाजी कुमकर यांनी मानले.

# अनेक शेतात वनभोजनाचा आस्वाद

**कंधार : (समर्थ गांवकरी)**



बैलपोळा आणि वेळ अमावस्या हे सण शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे समजले जातात. बैल पोळा या दिवशी ज्याच्या जीवावर शेती चालते, त्या बैलांना खाऊपिऊ घालून पुजा केली जाते तर वेळ अमावस्येच्या दिवशी ज्याच्यावर आपला उदरनिर्वाह चालतो, त्या काळया आईची पूजा केली जाते आणि सगे सोयरे, मित्रमंडळींना एकत्र बोलावून आंबिल,खिचडा, भजी, हिरव्या भाज्या,भाकरी वनभोजनाचा आस्वाद दिला जातो, म्हणून हा दिवस शेतकऱ्यांसाठी महत्वाचा मानला जातो. भारतासारख्या कृषीप्रधान देशात कृषीशी निगडित अनेक सणवार असतात. असाच एक सण म्हणजे वेळ अमावस्या. वेळ अमावास्या हा केवळ एक सण नाही.हा निसर्गाला धन्यवाद देण्याचा दिवस तर पूर्वजांच्या आठवणींना उजाळा देण्याचा दिवस आणि शेतकऱ्याच्या कष्टांचा सन्मान करण्याचा दिवस मानला जातो.शेतातील काळ्या आईचे ऋण फेडण्यासाठी या दिनी तिची मनोभावे पूजा केली जाते. गावातील सर्व लहान थोर शेतात वन भोजनाचा आनंद लुटतात.

हा सण लातूर भागात मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. या जिल्ह्यात कृषी संस्कृतीत ही वेळ अमावस्येच्या दिवशीची पूजा महत्त्वाची मानली जाते. या दिवशी शेतात कडब्याचे कोप करून शेतातल्या लक्ष्मीची पूजा मांडली जाते, शेतात खरीप आणि रब्बी या दोन हंगामात मिळून वेळ अमावस्येच्या दिवशी लक्ष्मीची पूजा केली जाते, या दिवशी लक्ष्मीची मातीची मूर्ती तयार केली जाते. कडब्याच्या कोपात लक्ष्मीची पूजा केली जाते, शेतातील पांडवांना नवा रंग दिला जातो, रब्बी हंगामातील गहु, हरबरा, ज्वारी, करडी, सुर्यफुल आदी पिकांत आंबील शिंपून 'रब्बीचा हंगाम चांगला होऊ दे' अशी प्रार्थना केली जाते.



# सामाजिक कार्यकर्ते आनंद सोनटक्के यांच्या वतीने जेष्ठ नागरिकाना ब्लँकेट वाटप

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील लोणी (बु) येथ सामाजिक कार्यकर्ते,पत्रकार आनंद सोनटक्के यांच्या पुढाकाराने उपस्थिती जेष्ठ नागरिकांना ब्लँकेट वाटप दि.१९ डिसेंबर रोजी करण्यात आले.

सामाजिक कार्यकर्ते,पत्रकार दर वर्षी विविध सामाजिक उपक्रम राबवून जेष्ठ नागरिकांची सेवा करतात.पावसाळ्यात छत्री तर हिवाळ्यात ब्लँकेट वाटप करत असतात.सध्या थंडी अतिशय प्रमाणात जाणवत असून या थंडीमुळे जेष्ठ नागरिकाना हुडहुडी भरत आहे. प्रचंड थंडीचा सामना करावा लागतो असल्यामुळे आनंद सोनटक्के यांनी येथील जेष्ठ नागरिकाना थंडी पासून बचाव व्हावा यासाठी ब्लँकेट वाटप केले.त्यांच्या सामाजिक कार्याचे अनेकांनी कौतुक केले. यावेळी श्रीकांत वाघमारे,रामजी गंगासागरे, पत्रकार गंगाधर सोनटक्के,बालाजी कनकटे,बजरंग बोबडे यांच्या सह आदींची उपस्थिती होती.

# वाळू माफियांवर 'सर्जिल स्ट्राईक'!

**श्रीरामपूर : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील गोदावरी नदीपात्रातून होणाऱ्या अवैध वाळू उत्खननाविरोधात महसूल प्रशासनाने आक्रमक पवित्रा घेतला असून, तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांच्या नेतृत्वाखालील पथकाने गेल्या पाच दिवसांपासून वाळू माफियांवर 'सर्जिकल स्ट्राईक' सुरू केला आहे. या धडक मोहिमेत केवळ साहित्याची जाळपोळच केली नाही, तर जप्त केलेली वाळू थेट घरकुल लाभार्थ्यांना देऊन प्रशासनाने आपली प्रतिमा उंचावली आहे. "तालुक्यात अवैध गौण खनिज प्रतिबंधात्मक पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापुढेही अवैध उत्खनन किंवा वाहतूक आढळल्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ४८ (७) नुसार कडक दंडात्मक कारवाई करण्यात येईल."

# संत ज्ञानेश्वर विद्यालयात तालुकास्तरीय विज्ञान गणित प्रदर्शनाचे आयोजन



**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

शहरातील संत ज्ञानेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पाथर्डी या ठिकाणी दि. २२ डिसेंबर ते २४ डिसेंबर या कालावधीत तालुकास्तरीय विज्ञान - गणित प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती शिक्षण विस्तार अधिकारी तथा प्रदर्शन प्रमुख श्री. रामनाथ कराड यांनी दिली. संत ज्ञानेश्वर विद्यालयात आयोजित नियोजन बैठकीत ते बोलत होते.यावेळी ते म्हणाले की, सदर प्रदर्शन आमदार मोनिकाताई राजळे यांच्या अध्यक्षतेखाली, खासदार निलेश लंके यांच्या शुभहस्ते व विधान परिषद सदस्य शिवाजीराव गर्जे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे.सदर प्रदर्शनाचा मुख्य विषय विकसित आणि आत्मनिर्भर भारतासाठी स्टेम हा असून यामध्ये शाश्वत शेती, कचरा व्यवस्थापन व प्लास्टिकला पर्याय, हरित ऊर्जा, उद्योन्मुख तंत्रज्ञान, आरोग्य व स्वच्छता, मनोरंजनात्मक गणितीय मॉडेल, जलसंवर्धन या उपविषयांचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर प्रतिकृतींचे परीक्षण करण्यासाठी इतर तालुक्यातील तज्ञ शिक्षक परीक्षक म्हणून निमंत्रित करण्यात येणार आहेत. प्रदर्शनाच्या अनुशंगाने विविध समित्या तयार करून कामकाजाचे अचूक नियोजन करण्यात आले आहे. प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी गटशिक्षणाधिकारी शिवाजीराव कराड, शिक्षणविस्तार अधिकारी व प्रदर्शन प्रमुख रामनाथ कराड, सहदेव दादा शिक्षण मंडळाचे सचिव महेंद्र शिरसाट, प्राचार्य सुरेश मिसाळ, संत ज्ञानेश्वर विद्यालयातील सर्व कर्मचारी वृंद,विज्ञान अध्यापक संघाचे अध्यक्ष सुनिल कटारिया, गणित अध्यापक संघाचे अध्यक्ष राजू पवार या सह संघटनेचे पदाधिकारी संपत घारे, चंद्रकांत उदागे,आदिनाथ शिदोरे, सचिन लोव्हाडे, अरुण नेहुल, सुभाष सोनवणे, धर्मराज शिरसाट, सुनिल शिरसाट विशेष मेहनत घेत आहेत. प्रदर्शनाची जय्यत तयारी झाली असून तीन दिवस या ठिकाणी विज्ञान यात्रेचे स्वरूप येणार आहे.तरी या प्रदर्शनास भेट देण्यासाठी जास्तीत जास्त शाळांनी यावे व तालुक्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन शिक्षण विभाग व विज्ञान- गणित अध्यापक संघटनेच्या वतीने करण्यात येत आहे.

# शेतात ऊसतोड कामगार व कष्टकरी शेतकऱ्यांशी चेअरमन शेरकर यांचा संवाद





**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

शिरोली खुर्द येथील प्रगतशील ऊस उत्पादक शेतकरी अनिल बाबुराव मोरे यांनी आपल्या उसाच्या शेतात ८६०३२ वाणाचे अडसोली ऊस पिकाचे उत्तम नियोजन केले आहे . एका उसाला सरासरी ४५ कांड्या आल्या आहेत . १७ महिन्यात उत्तमरीत्या पिकवलेल्या त्यांच्या दोन एकर क्षेत्रातील उसाची ऊसतोड चालू असताना श्री विघ्नहर सहकारी साखर कारखाना चेअरमन सत्यशील शेरकर यांनी ऊसतोड कामगार व कष्टकरी शेतकऱ्यांची आपुलकीचा संवाद साधला आहे .

येथील क्षेत्रात ऊस लागवड , खत औषधे व्यवस्थापन , पाणीपुरवठा ते ऊसतोड दरम्यान शेतकरी मोरे यांनी केलेल्या सुयोग नियोजनामुळे कष्टाने विक्रमी उत्पादन घेण्यात यशस्वी ठरले आहेत.

या काळात त्यांना ऊस विकास अधिकारी संदीप मोरडे व कारखान्याचे कर्मचारी शिरोली बुद्रुक गट ऑफिसच्या वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले आहे . सध्या कडाक्याच्या थंडीत भल्या पहाटे ऊसतोड कामगार शेतकरी यांच्या उसाच्या फडात जाऊन ऊसतोड करून सर्जा राजाच्या साथीने ऊस वाहतूक करून शेतकऱ्यांच्या मालाची काळजी घेत आहे.

श्री विघ्नहर कारखान्यावर ऊस पोच करणाऱ्या या ऊसतोड कामगारांशी चेअरमन सत्यशील शेरकर यांनी आपुलकीचा संवाद साधला.

यावेळी शेतकरी मार्तंड मांडे , गेनभाऊ मोरे , विश्वास जाधव , विक्रम मोरे , प्रविण ढोमसे , प्रशांत थोरात बाजीराव सोमवंशी , मारुती जाधव , संतोष ढोमसे , अनिल मोरे , कैलास मोरे व ग्रामस्थ यावेळी बहुसंख्येने उपस्थित होते.

# मनुष्याचे अज्ञान व भय दूर करण्याचे कार्य गंगागिरी महाराजांनी केले

## रामगिरी महाराज

**वडाळा महादेव : (समर्थ गांवकरी)**

मनुष्य देह मिळाल्यानंतर या जन्माचे नेमके प्रयोजन काय आहे, हे प्रत्येकाला कळणे गरजेचे आहे. मृत्यूलोकात माणूस स्वार्थासाठी जागा आहे, पण आत्मकल्याणासाठी अज्ञानी आहे आणि लोकांचे हे अज्ञान व भय दूर करण्याचे कार्य सद्गुरु गंगागिरी महाराज व संतानी सोप्या साध्या शब्दातील ग्रंथ विचारातून केले म्हणूनच संतांचे विचार आजही सुर्यासारखे प्रखर आहेत. या विचारांचे सर्वांकडून आचरण होणे हाच खरा परमार्थ आहे असे प्रतिपादन महंत रामगिरी महाराजांनी केले.

# निकालाच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांना मार्गदर्शन



**भोकर तालुका : (समर्थ गांवकरी)**

भोकर नगरपरिषद सावत्रिक निवडणूक 2025 च्या पार्श्वभूमीवर पोलीस स्टेशन भोकर येथे दिनांक 17 रोजी सायंकाळी दरम्यान नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या उमेदवाराची महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. ही बैठक डी एस हाके उपविभागीय पोलीस अधिकारी भोकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. दिनांक २० डिसेंबर रोजी होणाऱ्या प्रभाग क्रमांक एक ( ब ) च्या मतदान प्रक्रिये बाबत तसेच दिनांक 21 डिसेंबर रोजी होणाऱ्या मतमोजणीच्या अनुषंगाने आवश्यक त्या दक्षतेबाबत उमेदवारांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. मतदान व मतमोजणीच्या दिवशी तसेच त्यानंतर कायदा सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी कोणती काळजी घ्यावी यावर भर देण्यात आला .यावेळी डी एस हाके उपविभागीय पोलीस अधिकारी ,अजित कुंभार पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन भोकर यांनी उमेदवारांना सोशल मीडियाच्या वापराबाबत आचारसंहितेचे पालन करावे अफवा पसरवून नये व गैरप्रकार टाळावे तसेच प्रशासनाकडून राबविण्यात येणाऱ्या सुरक्षात्मक उपाययोजनाची माहिती दिली या बैठकीस नगराध्यक्ष पदाचे व नगरसेवक पदाचे उमेदवार उपस्थित होते. शांततेत पारदर्शक निवडणूक प्रक्रिया पार पाडल्यासाठी सर्व उमेदवारांनी सहकार्य करावे असे आव्हान पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

# दोन विद्यार्थ्यांची भारतीय सैन्य दलात निवड

**अहमदनगर : (समर्थ गांवकरी)**

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे श्री ढोकेश्वर कॉलेज टाकळी ढोकेश्वर महाविद्यालयातील एन. सी. सी. विभागाच्या दोन विद्यार्थ्यांची भारतीय सैन्य दलात निवड झाली. त्यातील प्रेम औटी हा एफ.वाय. बी.ए. तर संतोष उकांडे हा एस.वाय. बी.एस्सी. या वर्गात शिकत आहेत . ग्रामीण भागातील महाविद्यालयातून निवड झालेले हे दोनही ही विद्यार्थी गरीब शेतकरी कुटुंबातील असून त्यांची राष्ट्र सेवेत निवड झाल्याने त्यांचे आई-वडिलांनी खूप समाधान व्यक्त केले. महाविद्यालयाच्या वतीने निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्रजी दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड.विश्वासराव आठरे पाटील , सहसचिव मुकेश मुळे, खजिनदार ॲड. दिपलक्ष्मी म्हसे पाटील, ज्येष्ठ विश्वस्त सितारामजी खिलारी तसेच अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनीही यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व संतोष व प्रेम यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# भारती एअरटेल कंपनीच्या नेतृत्वबदलाची घोषणा : गोपाळ विठ्ठल यांची पदोन्नती

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**



गेल्या १३ वर्षांपासून गोपाळ विठ्ठल यांनी भारती एअरटेलचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी पदाची जबाबदारी समर्थपणे पेलली आहे. ऑक्टोबर २०२४ रोजी कंपनीच्या सुनियोजित उत्तराधिकार प्रक्रियेचा भाग म्हणून गोपाळ विठ्ठल यांची भारती एअरटेलच लिमिटेडच्या उपाध्यक्षपदीदेखील नियुक्ती करण्यात आली होती. या बदल पक्रियेचा भाग म्हणून आता कंपनीच्या नेतृत्वात बदल करण्यात आले आहेत. गोपाल विठ्ठल यांच्याजागी शाश्वत शर्मा यांची कंपनीचे नियोजित मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नव्या वर्षांत शर्मा या नव्या पदाचा कार्यभार स्विकारतील. व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून यशस्वीरित्या काम पाहणाऱ्या गोपाल विठ्ठल यांची पदोन्नती झाल्याचे कंपनीच्यावतीने जाहीर करण्यात आले आहे. १ जानेवारी २०२६ पासून गोपाळ विठ्ठल कंपनीच्या कार्यकारी उपाध्यक्ष पदाची सूत्रे सांभाळतील. गोपाळ विठ्ठल यांच्याकडे भारती एअरटेलसह कंपनीसह सर्व उपकंपन्यांच्या कामकाजाचे नेतृत्व आणि देखरेख करण्याची महत्त्वाची जबाबदारी असेल. विठ्ठल डिजिटल व तंत्रज्ञानासंबंधीच्या कामकाजांसह विविध निर्णय प्रक्रियेत सहभागी असतील. यात नेटवर्क धोरण, विविध कामकाजांविषयीची खरेदी प्रक्रिया तसेच मानव संसाधन या विविध विभागांच्या कामकाजांचे समन्वय साधणे तसेच या सर्व प्रक्रियेत समूहाची एकात्मता वाढवणे आदी कामकाजांचा समावेश असेल. समूहाची धोरणात्मक दिशा ठरवणे आणि संस्थेला भविष्यातील बदलांसाठी सक्षम तसेच सज्ज करणे यावर त्यांचा विशेष भर देतील. भविष्यकालीन नवकल्पना, तांत्रिक प्रगती आणि दीर्घकालीन वाढ हे सुनिश्चित करण्यासाठी गोपाळ विठ्ठल यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. येत्या नवीन वर्षांच्या पहिल्या दिवसापासूनच शाश्वत शर्मा हे भारती एअरटेल इंडियाचे नवे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी पदाची धूरा सांभाळतील. गेल्या वर्षभरापासून शर्मा नव्या जबाबदारीच्या पूर्वतयारीचा सखोल अभ्यास करत आहेत. शर्मा हे नियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी या पदनामासह गोपाळ विठ्ठल यांच्यासोबत आगामी नियुक्त पदाची संपूर्ण माहिती घेत आहेत. शर्मा यांनी पूर्वतयारी प्रक्रियेतच कंपनीच्या विविध कामकाजांचा जवळून अनुभव घेतला आहे. नवीन पदभार स्विकारल्यानंतर ते गोपाळ विठ्ठल यांना कामकाजाचा अहवाल देत राहतील.

सध्या सौमेन रे हे भारती एअरटेल इंडियाचे मुख्य आर्थिक अधिकारी म्हणून काम पाहत आहे. येत्या काळात सौमेन रे यांची समूहाच्या मुख्य आर्थिक अधिकारी या पदावर नेमणूक केली जाईल. गोपाळ विठ्ठल यांच्या मार्गदर्शनाखाली सौमेन रे नव्या पदाचे कामकाज पाहतील. सौमेन रे यांनी गेल्या चार वर्षांपासून मुख्य आर्थिक अधिकारी पदाची धूरा अत्यंत यशस्वीपणे सांभाळली आहे. भारती एअरटेलची आर्थिक कामगिरी उंचावण्यात आणि कंपनीला आर्थिक स्थैर्यता प्राप्त करुन देण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे.


कंपनीचे फायनान्शिअल कंट्रोलर म्हणून काम पाहणाऱ्या अखिल गर्ग यांची भारती एअरटेल इंडियाचे मुख्य आर्थिक अधिकारी म्हणून नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. गर्ग गेल्या १२ वर्षांपासून कंपनीच्या कामकाजात महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. या काळात त्यांनी कंपनीच्या विविध विभागांमध्ये महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. त्यांनी हेक्साकॉम आयपीओ यांसारख्या मोठ्या आणि महत्त्वाच्या व्यावसायिक प्रकल्पांचे यशस्वीरित्या नेतृत्व केले आहे.

# गेली २७ वर्षे झाली तो चालतोच आहे!



## संपादकीय

जग वेगाच्या चाकावर स्वार झालं आहे. प्रत्येकाला प्रत्येक गोष्ट अतिशय झटपट हवी आहे. अशा जगात एक व्यक्ती आहे जो आपल्या पायातल्या ताकदीवरचा विश्वास टिकवून आहे. कार्ल बशबी त्याचं नाव. आपल्या लक्ष्यापर्यंत पोहोचण्यासाठी आधुनिक जगातली वेगवान चाकं नाकारून तो पायी चालत निघाला आहे. २७ वर्षांपूर्वी सुरू केलेला त्याचा पायी प्रवास आजही सुरूच आहे. हा प्रवास जेव्हा तो पूर्ण करेल तेव्हा त्याने पृथ्वीची पायी प्रदक्षिणा पूर्ण केलेली असेल! इंग्लंडमधील यॉर्कशायर परगण्यातील हल हे एक बंदरशहर आहे. या शहरातील ५६ वर्षांचा कार्ल बशबी हा माजी ब्रिटिश पॅराट्रूपर आहे. विमानातून थेट पॅराशूटने शत्रूच्या प्रदेशात उतरून कारवाई करण्याचं साहस त्याने अनेकदा दाखवलं. सैन्यात असताना वेगवेगळ्या मोहिमांच्या निमित्ताने त्याचं प्रवासावर प्रेम जडलं. वेगवेगळ्या ठिकाणी जाण्याचं आणि अनुभव घेण्याचं वेडच त्याला लागलं. निवृत्तीनंतरच्या आयुष्यात ध्येय आणि साहस असायला हवं असं वाटत असतानाच त्याने पृथ्वीला पायी प्रदक्षिणा घालण्याची मोहीम आखली. या अचाट मोहिमेला त्याने गोलिएथ एक्स्पिडिशन' असं नाव दिलं. ही साहसी मोहीम आखताना सुरुवातीला त्याने आठ वर्षांची कालमर्यादा ठरवली होती. पण आज २७वर्षांनंतरही तो आपल्या लक्ष्याच्या दिशेने चालतोच आहे. अनेक खंडातून पायपीट करत, टोकाच्या भौगोलिक प्रदेशातून प्रवास करताना कार्लने असंख्य अडचणी, अडथळे आणि समस्यांचा सामना केला. उत्तर कोलंबिया आणि दक्षिण पनामा ओलांडल्यावर ९७ किलोमीटरच्या रेनफॉरेस्टने, अमेरिका आणि रशिया दरम्यानच्या बर्फाळ सामुद्रधुनीने कार्लची परीक्षा पाहिली. गोठवणाऱ्या थंडीत सामुद्रधुनी पार करण्यासाठी त्याला १४ दिवस चालावं लागलं. आता त्याचा कस लागणार आहे तो फ्रान्स आणि इंग्लंडला वेगळं करणाऱ्या 'चॅनेल बोगद्या'त. रेल्वेसाठीच्या बोगद्यातून त्याला चालता येणार नाही. टनेलची देखभाल दुरुस्तीचं काम करणाऱ्या टीमसाठी बनवलेल्या मार्गावर चालण्याचा पर्याय त्याच्यासमोर आहे पण त्यासाठी तेथील नोकरशाहीच्या



परवानगी जाचातून त्याला जावं लागणार आहे. त्यासाठी किती वर्ष लागतील हे कार्ललाच माहिती नाही. कार्लला इराण आणि रशियामध्ये सुरक्षितरित्या प्रवेश करणं अशक्य झालं, समुद्रामार्गे जाणं हाच त्याच्यासमोर पर्याय होता, तेव्हा त्याने कझाकस्तान ते अझरबैजान असा प्रवास कॅस्पियन समुद्रात पोहून केला. ३१ दिवस १३२ तास पोहून त्याने १७९ मैल अंतर पार केलं. अझरबैजान आणि तुर्कीमधून चालत तो इस्तंबूलच्या बॉस्फरस सामुद्रधुनीत पोहोचला.

१९९८ मध्ये कार्लने जेव्हा प्रवासाला सुरुवात केली तेव्हा त्याच्यासमोर ३६,००० मैलाचा रस्ता होता, पण पायीच प्रवास करायचा यावर तो ठाम होता. २००८ मध्ये मेक्सिकोमध्ये व्हिसा नाकारल्याने तो पाच वर्ष अडकून पडला.

रशियाने त्याच्यावर पाच वर्षांची बंदी घातली. त्याच्या मोहिमेच्या प्रायोजकांनी साथ सोडल्याने कार्ल मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला, पण त्याने प्रवास थांबवला नाही. आता कार्ल युरोप खंडात हंगेरी येथे आहे. तो त्याच्या लक्ष्यापासून ९३२ मैल दूर आहे. सप्टेंबर २०२६ मध्ये तो हलला पोहोचेल. २७ वर्ष रोज नवीन आव्हानांना छातीवर घेणाऱ्या कार्लला घरी गेल्यावर काय करायचं हे मात्र सूचत नाहीये.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ६२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | | 6 | | 1 | 2 | | |
| | | 1 | | | 8 | 3 | | 6 |
| | | | | 9 | | 5 | 1 | 7 |
| | 7 | | | | 9 | 6 | | 1 |
| | 6 | | | | | | 7 | |
| 3 | | 9 | 7 | | | | 2 | |
| 1 | 2 | 3 | | 4 | | | | |
| 9 | | 8 | 3 | | | 4 | | |
| | | 6 | 5 | | 2 | | 3 | |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ६१ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 3 | 5 | 2 | 9 | 7 | 6 | 1 | 4 |
| 4 | 7 | 6 | 1 | 3 | 8 | 5 | 9 | 2 |
| 1 | 9 | 2 | 4 | 6 | 5 | 7 | 8 | 3 |
| 3 | 6 | 8 | 7 | 5 | 9 | 2 | 4 | 1 |
| 9 | 2 | 1 | 3 | 4 | 6 | 8 | 5 | 7 |
| 7 | 5 | 4 | 8 | 1 | 2 | 9 | 3 | 6 |
| 2 | 1 | 9 | 5 | 7 | 4 | 3 | 6 | 8 |
| 5 | 4 | 7 | 6 | 8 | 3 | 1 | 2 | 9 |
| 6 | 8 | 3 | 9 | 2 | 1 | 4 | 7 | 5 |

पंचांग
२०डिसेंबर२०२५
शनिवार
विक्रम संवत्- २०८२
मार्गशीर्ष शके
संवत्- १९४७

संवत्सर - विश्वावसूनाम
अयन- दक्षिणायण
मास- मार्गशीर्ष
ऋतु - सौर हेमंत
कृष्ण पक्ष
तिथि:अमावस्या

०७:१३:०६
नक्षत्र:मूल २५:२१:२४+
योग:गण्ड १६:१६:४६
करण:नाग ०७:१३:०६
करण:किस्तुघ्न
२०:१४:१६

## उपदेशाचे डोस

### कुंतीचे मागणे

युद्ध संपले होते. धर्मराजाला राज्याभिषेक झाला होता. श्रीकृष्ण द्वारकेला जाण्याचा विचार करू लागला तेव्हा पांडवमाता कुंती त्याला भेटायला आली. श्रीकृष्ण तिला म्हणाला, "कुंती ! मी आता परत जातो. तुला हवे ते मागून घे." तेव्हा कुंती म्हणाली, 'गोविंदा ! जीवनामध्ये माझ्यावर पुन्हा पुन्हा संकटे येऊ देत. तू भगवत्स्वरुप आहेस. संकटात वारंवार तुझे दर्शन घडते." हे मागणे ऐकून श्रीकृष्णाने विचारले. "अगं, जीवनामध्ये दुःखाचे व विपत्तीचे वरदान कुणी मागतो का? हे तू काय मागतेस?" कुंतीने उत्तर दिले, "श्रीकृष्णा ! जेव्हा विपत्ती येते तेव्हा तू आमचे रक्षण करण्यास येतोस म्हणून तुझे दर्शन होते. तुझे दर्शन झाले की जीव पुन्हा संसारात रमत नाही पण ते तुझे दर्शन संकटामध्येच होत असते." आपला मुलगा राजा झाला हे तिने पाहिले. आता विपत्काल हातचा गेला असे तिला वाटले.

कथा उपदेश : संकटामध्ये ज्या उत्कटतेने ईश्वराचे स्मरण व चिंतन घडते तसे इतर वेळी होत नाही.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९९८- नकेम चुक्कू या स्त्रीस एकाच गर्भारपणात आठअपत्यांची प्राप्ती झाली.
- २००७- ऑस्ट्रेलियाने न्यूझीलँडचा तिसऱ्या व शेवटच्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात ११४ धावांनी फज्जा उडवत चॅपल-हॅडली चषकाच्या तीन सामन्यांची मालिका २-० ने जिंकली.
- २००७- पाकिस्तानातील एक प्रसिद्ध चित्रकार इस्माइल गुल्गी, तिचा पत्नी आणि एका नोकराची कराची येथील त्यांच्या राहत्या घरी निर्घृण हत्या करण्यात आली.

### राष्ट्रीय

- १७५७- रॉबर्ट क्लाईव्हची बंगालचा गव्हर्नर म्हणून नेमणूक करण्यात आली.
- १९४२- कलकत्यावर जपानी विमानांनी बॉम्ब टाकले.
- १९३३- विष्णुशास्त्री बापट या संस्कृत विद्वानाचे निदन. अनेक संस्कृत ग्रांथांची त्यांनी मराठीत भाषांतरे केली.


### जन्म

- १८७६- रमण महर्षींचा जन्म.
- १९०१- पदार्थवैज्ञानिक रॉबर्ट व्हॅन डी ग्राफ यांचा जन्म. १० लक्ष व्होल्ट एवढ्या दाबाचा विद्युत प्रवाह निर्माण करणाऱ्या व्हॅन डी ग्राफ जनित्राची त्यांनी निर्मिती केली.
- १९४०- सुप्रसिद्ध नर्तकी यामिनी कृष्णमूर्ती यांचा जन्म.

### निधन

- १९५६- संत गाडगे महाराजांचा मृत्यू.
- १९६८- जॉन स्टाईनबेक या नोबेल पारितोषिक विजेत्या अमेरिकन साहित्यिकाचे निधन.
- १९९८- ॲस्ट्रॉलॉजिकल मॅगेझीनचे आधारस्तंभ व जागतिक कीर्तीचे फलज्योतिषी बी. व्ही. रमण यांचे निधन.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ६२



**आडवे शब्द**

१. कोकणाला तडाखा देऊन गेलेले चक्रीवादळ
४. दुसऱ्यासाठी केलेला खर्च
८. यजमान
१०. अतर्क्य गोष्ट घडणे
११. जादू
१३. संरक्षणकर्ता
१४. वाईट इच्छा
१५. मुंबईचा घरगडी
१६. पवन
१७. अरण्य, जंगल
१८. शरीर
२०. गाय
२१. युवती
२२. टीका, समीक्षा करणारा
२५. रत्न
२७. मनात साठवलेल्या अभद्र गोष्टी (ला.)
२८. एक मिश्र धातू
३०. प्रतिष्ठित
३२. पायाला भेगा पडण्याचा रोग
३४. चिंतन
३६. वाणी, बोलणे
३८. मूळ आधार
३९. घटस्फोट
४०. निमग्न, गुंग
४२. ललाट
४३. जन्म-मृत्यू
४५. खूपच छान!
४७. शहर
४८. बारा वर्षांचा काळ
५०. टिकून रहाणे
५१. स्तुती करण्याजोगे
५३. आरोप
५४. पूजेचे ताट
५६. चित्रपट-नाटक इ.ची गोष्ट
५८. समूळ नाश
५९. मंत्रिमंडळ
६२. मेहेरबानी
६३. अंड्यातील पिवळा भाग
६५. भाजी चिरण्याचे साधन
६६. मोठे उथळ ताट
६७. धमकी
६९. गुंडी (इंग्रजी)
७०. धन्यवाद
७२. तात्काळ
७३अ. विश्व
७४. वस्ती
७४अ. तबस्सुमप्रमाणेच 'सदाहरित' अभिनेत्री --- जलाल
७५. रवाळ

**उभे शब्द**

१. खळबळजनक
२. मागणारा
३. दारूचा एक प्रकार
४. अनुमती
५. सजावट करणारा
६. कोवळी फांदी
७. केर
८. तंतुवाद्य वाजवताना बोटात घालण्याचे तारेचे साधन
९. पत्त्यातील जोडपे
९अ. घरगुती पिठाची चक्की
१२. तिबेटी धर्मगुरु
१६. मुंग्याचे घर
१९. वेदना
२१. अंधार (संस्कृत)
२३. अंजनाचा एक प्रकार
२४. चांदी
२६. नमन
२७. एक सुगंधी वनस्पती
२९. वडील
३१. सावली
३२. छातीतील दाह
३३. गाड्या उभ्या ठेवण्याची जागा
३४. असह्य वेदना
३५. मान खाली घातलेला
३७. हालचालींवर ठेवलेली नजर
३९. पुष्कळ
४१. पुत्र, मुलगा
४४. नंतर
४६. च्या साठी
४९. बिल्ला
५२. रूचीहीन
५३. आपला-परका असा भेद
५५. मोठे (डोळे), ओबडधोबड
५७. दृष्टीभेट
५८. भांडण लावणारा मुनी
६०. सुट्टीचा दिवस
६१. शेती म्हणजे शेतकऱ्यासठी – आई
६४. कीर्तनकार
६६. गुणाकार
६८. सहाय्य
६९. चिनीमातीचे उभट पात्र
७१. पृथ्वी
७२अ. शाहिराचे वाद्य
७३. हिंदीत साधा, सालस

उत्तर उद्याच्या अंकात

**शब्दकोडे क्र. ६१ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.पंगत ३.माजघर ६.निकाल ८.अर्जुन १०.गजानन १२.माणिक १३.प्रतारणा १५.टवटवीत १७.धार १८.राखणदार २०.रजई २२.नकार २४.रम २५.शारदा २८.नाविन्य २९.नफा-नुकसान ३२.संथ ३४.पदभ्रमण ३६.खा-खा सुटणे ३९.विलक्षण ४१.रस ४२.पदोपदी ४४.मेष ४५.मातीमोल ४७.डर ४८.मकरंद ५०.माया ५१.कात ५२.काका ५३.खास ५४.कवच ५५.रातवा ५८.ललत ५९.कर ६२.खरखरीत ६५.जळका ६७.वर्तन ६८.परत ७०.यातायात ७३.नाका ७४.सरतेशेवटी ७७.पत्रास ७८.प्राण ७९.आरसा ८०.तर ८१.ताट ८२.दीन

उभे उत्तर : १.पंतप्रधान २.तगर ३.मान ४.जनगणमन ५.रमावर ६.निकट ७.लगट ८.अवांतर ९.नवलाई ११.जाणारा १४.तारकनाथ १६.वरदान १९.खर २१.जस्त २३.रवि २५.शाक २६.रसातल २७.संवाद ३०.फासणे ३१.सणसणीत ३२.संताप ३३.वसु ३४.पणती ३५.मध ३६.खापर ३७.खादी ३८.टणक ३९.विष ४०.क्षमायाचक ४३.दोडका ४४.मेंद ४६.मोगरा ४८.मसलत ४९.रंगीत ५०.माव ५१.कावा ५२.काळोख ५४.कपाळ ५६.तलाव ५७.मखर ६०.रथयात्रा ६१.जनगणना ६३.रपका ६४.रीतसर ६५.जनावर ६६.काया ६९.जाते ७१.तापट ७२.तसदी ७३.नाणे ७५.रसा ७६.शेत

# शिंदे शिवसेनेचा ६०% ४० % चा फॉर्मुला भाजप स्वीकारेल काय ?

- स्थानिक आमदार आसलेल्या पक्षा ना ६०% टक्के जागा द्यावे शिवसेनेची मागणी
- युतीत अलबेल दिसेना युतीचा तिढा सुटेना

नांदेड जिल्हा - अनिल धमने : (समर्थ गांवकरी)

केंद्र व महाराष्ट्र राज्यात सत्तेत असलेले पक्ष भाजप व शिंदे शिवसेना तसेच राष्ट्रवादी अजित पवार गट या पक्षाची महाराष्ट्र राज्यात युती आहे मात्र नांदेड मध्ये सध्या तरी संभ्रम निर्माण झाले आहे महाराष्ट्राचे नेते माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभेचे भाजपाचे खा अशोकराव चव्हाण हे सांगतात यूती धर्म पाळु मात्र राष्ट्रवादी सोबत नसून शिंदे सेने सोबत युती करू मात्र शिंदे शिवसेनेचे नांदेड उत्तर व नांदेड दक्षिण च्या दोन्ही मतदार संघाचे विद्यमान आमदार आसल्या मुळे शिंदे शिवसेनेचे नेते तथा विधान परिषदेचे आ हेमंत पाटील यांच्या बोलण्यानुसार त्याच्या पक्षाचे स्थानिक दोन्ही मतदार संघाचे आमदार असल्या मुळे स्थानिक पातळीवर आमच्या पक्षाला ६० % जागा द्यावे व इतर भाजपा व राष्ट्रवादी अजित पवार गटाने २०% २० % दोन्ही पक्षाने घ्यावे असे यूती तील घटक पक्षाचे आ हेमंत पाटील यांनी एका मुलाखतीत म्हणटले आहे मात्र हा फॉर्मुला भाजपा स्विकारणार का हे शक्य दिसत नाही कारण सध्या तरी नांदेड जिल्ह्यात अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वात नांदेड जिल्ह्या मध्ये भाजपाचे ५ आमदार व दोन खासदार असे लोक प्रतिनिधी असल्यामुळे सध्याच्या परिस्थितीत नांदेड जिल्ह्या मध्ये भाजपा एक नंबर चा पक्ष ठरला आहे त्यामुळे भाजपाचे स्थानिक नेते स्ट्रॉंग असल्यामुळे त्यांना इतर पक्षाची गरज असेल असे सध्याची तरी परिस्थिती नाही पण शिंदे शिवसेना ही काही कमी नाही त्यांचे ही सध्या ४ आमदार आहेत तिन विधनसभा तर एक विधान परिषद असे एकुण चार आमदार आहेत त्यामुळे ते म्हणतात ॥ हम बी किसी से कम नही ॥ राहीला विषय राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचा एक आमदार आहे मात्र त्यांनी पण मी कुणाशी कमी नाही असे बोलत असून ते तर सध्या स्वबळाचा नारा देत हम अकेले चलेंगे असा नारा देत सध्या तरी वेगळी चुल मांडत असल्याचे दिसत असून कारण यापूर्वी झालेल्या नगर परिषद नगर पंचायत निवडणुकी मध्ये मात्र जिल्ह्यासह अनेक ठिकाणी एकमेकांच्या समोरा समोर उमेदवार देऊन विरोध करीत होते व एकमेकांवर नेते मंडळींनी आप आपल्या भाषणातू कुरघोडी करीत एकमेकांची उनीधुनी काढत होते पक्षातील नेते मंडळी मात्र निवडणुकी च्या वेळी चांगले तापलेले दिसतात कारण ऐन वेळी ॥आपण सर्व जन भाऊ मिळून मिसळून खाऊ ॥ असे म्हणणारे वरिष्ठ नेते म्हणतात स्थानिक पातळीवर यूती करा . नेते मंडळी मात्र कार्यकर्ते यांची निवडणुक असते ती म्हणजे नगर परिषद . नगर पंचायत . महानगर पालीका . जिल्हा परिषद पंचायत समिती या निवडणुकी मध्ये वरिष्ठ नेते मंडळी एकमेकांच्या विरोधात बोलणे एकमेकावर टिका टिप्पणी करणे असे कुरघोडी करीत ना यूती केली जाते ना आघाडी केली जातो कार्यकर्ते यांना कुरघोडी करूण पेटवले जाते यात मात्र कार्यकर्ते हे समजले जात नसतात कारण यात मरण आहे ते सर्व सामान्य कार्यकर्ता मात्र नेत्यांच्या निवडणुक म्हणजे विधानसभा लोकसभा या निवडणुकी मध्ये मात्र हे नेते मंडळी काही झाले तरी वरिष्ठ पातळीवर आपली कुणा सोबत कितीही जमत असेल किंवा नसेल काही देण घेण नसते त्यांनी यूती करणार म्हणजे करणार कारण त्यांना निवडून यायचे असते व सर्व पक्षाला एकत्र करूण आपल्याला कशा पद्धतीने जास्तीचे मतदान घेऊन निवडुण आले पाहीजे त्या मतासाठी विरिष्ठ नेते मंडळी ना विन वनी करून युती करूण आप आपला स्वार्थ साधून निवडून येत असतात मात्र हेच नेते मंडळी कार्यकर्ते यांच्या निवडणुकीत युती का केली जात नाही हेच कळेनासे झाले असून शेकडो कार्यकर्ते यांच्या कडे आहे ते ही जमा कुंजी घालून आर्थिक नुकसान करूण घेऊन स्वताचे कंबरडे मोडून घेऊन या नेत्यांच्या मागे भटकंती करावी का हाच प्रश्न अनेक कार्यकर्ते यांना पडल्याचे दिसते कारण सध्या तरी युती तील तिन्ही पक्षा मध्ये एकमेकांत कोणताच आलबेल नसल्याचे दिसून येत आहे.

तर गेल्या दोन दिवसा पुर्वी भाजपा चे स्थानिक नेते व शिवसेना शिंदे गटाचे स्थानिक नेते यांच्या आगामी महानगर पालीका निवडणुकीच्या अनुषंगाने युति संदर्भात एक प्राथमिक बैठक संपन्न झाली मात्र यात काही युतीचा तिढा सुटला का नाही काही माहिती आली नाही मात्र युती चा घोडा अडलेलाच आसल्याचे दिसून येत आहे तर शिवसेना शिंदे गटाचे विधान परिषदेचे आमदार हेमंत पाटील व राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या जवळीकते मुळे आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपा स्थानिक नेतृत्वाने सन्मान पुर्व जागा वाटपात जागा न दिल्यास शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी अजित पवार गटाची यूती होण्याचे संकेत दिसत आहेत तर भाजपा शिंदे शिवसेनेला ५०% जागा सन्मानजक देतील तर यूती करू नाही तर राष्ट्रवादी अजित पवार गट व शिवसेना शिंदे गट युती करून नांदेड वाघाळा महानगर पालीका पुर्ण ताकदीनीशी लढवली जाईल कारण भाजपा सोबत शिवसेने च्या दोन बैठका झाल्या मात्र त्याच्या कडून काही प्रतिसाद मिळाला नाही काही मार्ग निघाली नसून नांदेड उत्तर मध्ये ५ तर नांदेड दक्षिण मध्ये १ जागा देऊन भाजपा बोळवण करण्याच्या प्रयत्नात दिसून येते त्यासाठी आ हेमंत पाटील यांनी भाजपा वरिष्ठ पदअधिकारी यांना इशारा देतात की मी पण हि निवडणुक पुर्ण ताकदीनीशी लढवू असे ते काही चॅनेलवर मुलाखतीत सांगितले आहेत.

## शाळांना १९ व २० डिसेंबरला सुट्टी : पंकज आशिया

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)



जिल्ह्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर, ज्या शाळांमध्ये मतदान केंद्रे आहेत, अशा शाळांना शुक्रवार १९ डिसेंबर आणि शनिवार २० डिसेंबर २०२५ रोजी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी निर्गमित केले आहेत.

निवडणूक आयोगाच्या सुधारित कार्यक्रमानुसार जिल्ह्यातील संगमनेर, शिर्डी, राहुरी, श्रीरामपूर, शेवगाव, जामखेड व श्रीगोंदा (राहाता वगळून) तसेच कोपरगाव, देवळाली प्रवरा, पाथर्डी या नगरपरिषदा आणि नेवासा नगरपंचायत या ठिकाणी २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान पार पडणार आहे.

मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त अधिकारी आणि कर्मचारी मतदानाच्या एक दिवस अगोदर, म्हणजेच १९ डिसेंबर रोजी केंद्रांवर पोहोचणार आहेत. त्यामुळे निवडणूक कामात अडथळा येऊ नये, यासाठी संबंधित शाळांना दोन दिवसांची सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

या कालावधीत संबंधित मतदान केंद्रे (शाळांच्या इमारती) निवडणूक कामासाठी उपलब्ध राहतील तसेच तेथे पिण्याचे पाणी व वीज व्यवस्था सुरळीत राहील, याची दक्षता घेण्याचे निर्देश प्रशासनास देण्यात आले आहेत.

## यात्रेत सव्वा कोटीचा बोकड

नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)

माळेगाव यात्रेत दरवर्षी विविध पशु-पक्षी स्पर्धा तसेच खरेदी-विक्री मोठ्या प्रमाणात होत असते. याच पार्श्वभूमीवर यंदाच्या यात्रेत सव्वा कोटी रुपये किंमत असलेला उस्मानाबादी जातीचा बोकड विशेष आकर्षण ठरला आहे. यवतमाळ जिल्ह्यातील अंबाळी येथील रमाकांत यादवकळे यांनी हा बोकड विक्रीसाठी माळेगाव यात्रेत आणला आहे. हा बोकड पूर्णतः आकर्षक काळ्या रंगाचा असून, त्याच्या पाठीवर पांढऱ्या रंगात नैसर्गिकरीत्या उर्दूमध्ये अल्लाह असे लिहिल्यासारखे चिन्ह दिसून येत असल्याचे मालकांनी सांगितले. या वैशिष्ट्यांमुळे यात्रेत आलेल्या अनेक ग्राहकांची या बोकडावर नजर खिळली असून, आतापर्यंत २५ लाख रुपयांपर्यंत मागणी आली आहे.

## परंपरेचा वारसा जपणारा माळेगावचा घोडेबाजार; अश्वप्रेमींची अलोट गर्दी

नांदेड जिल्हा: (समर्थ गांवकरी)



दि. १९ डिसेंबर- दक्षिण भारतात प्रसिद्ध असलेल्या श्रीक्षेत्र माळेगाव येथील खंडोबा यात्रेला अनेक वैशिष्ट्यांची परंपरा लाभलेली आहे. देवदर्शनासोबतच घोड्याचे माळेगाव म्हणून ओळख मिळवून देणारा येथील भव्य घोडेबाजार हे यात्रेचे प्रमुख आकर्षण ठरते. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी माळेगाव यात्रेत देशभरातून विविध जातींचे घोडे दाखल झाले असून घोडेबाजारात लाखो रुपयांची उलाढाल होत आहे.


राजस्थान, गुजरात, कर्नाटक, पंजाब, सारंगखेडा मंडी यासह महाराष्ट्रातील विविध भागांतून तसेच उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, बिहार, उत्तराखंड येथून घोडे व्यापारी व अश्वप्रेमी मोठ्या संख्येने माळेगावात दाखल झाले आहेत. घोडेबाजारासाठी प्रसिद्ध असलेल्या या यात्रेत सिंध, काठेवाड, मारवाड, पंजाब, नुकरा, स्टॅलियन, बॉडा आदी जातींचे आकर्षक अश्व पाहायला मिळत आहेत.

घोडे खरेदी-विक्री करताना खरेदीदारांकडून सखोल चाचणी घेतली जाते. घोड्यांची चाल, ताकद, उंची, सौंदर्य, शिस्त व प्रशिक्षण यांची प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे पाहणी केली जाते. अनेक विक्रेते घोड्यावर स्वार होऊन विविध कवायती सादर करत असून घोड्यांची शिस्तबद्ध हालचाल व वेग प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे. विशेष बाब म्हणजे पांढऱ्या रंगाच्या घोड्यांना यंदाही अधिक मागणी दिसून येत आहे.

महाराष्ट्रातील हौशी घोडेपालक, शेतकरी व मोठे व्यापारी देखील मोठ्या प्रमाणात खरेदीसाठी माळेगावात उपस्थित आहेत. माळेगाव येथील घोडेबाजारात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर व्यवहार होत असल्याने अनेक व्यापारी गेल्या अनेक दशकांपासून आवर्जून येथे येत आहेत. घोडेबाजार हे केवळ व्यापाराचे केंद्र असून माळेगाव यात्रेची ओळख आणि परंपरेचा अभिमान ठरला आहे. अश्वांच्या विविध जाती, त्यांचे सौंदर्य व कौशल्य अनुभवण्यासाठी भाविकांसह अश्वप्रेमींची मोठी गर्दी याठिकाणी पाहायला मिळत आहे.

## पशुसंवर्धन विभागाच्या पशु, शेळी व कुक्कुट प्रदर्शन स्पर्धेचे उद्घाटन





नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)

श्रीक्षेत्र माळेगाव यात्रेनिमित्त जिल्हा परिषद नांदेडच्या वतीने पशुसंवर्धन विभागामार्फत माळेगाव यात्रेत आयोजित पशु, शेळी व कुक्कुट प्रदर्शन व स्पर्धेचे उद्घाटन आज कंधार-लोहा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते पार पडले.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप मालोदे, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे जिल्हा उपायुक्त डॉ. राजकुमार पडिले, माजी पशुसंवर्धन अधिकारी डॉ. भूपेंद्र बोधनकर, सहायक आयुक्त डॉ. प्रवीणकुमार घुले, डॉ. पुरी, सरपंच प्रतिनिधी हनुमंतराव धुळगंडे, नरेंद्र गायकवाड यांच्यासह पशुपालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावर्षी जिल्हा प्रशासनाने स्पर्धेच्या बक्षीस रकमेत भरीव वाढ केल्याबद्दल आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी जिल्हा प्रशासनाचे आभार मानले. यंदा विविध गटांत तब्बल १६२३ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला असून, मागील वर्षाच्या तुलनेत पशुपालकांचा सहभाग लक्षणीयरीत्या वाढल्याचे त्यांनी सांगितले.

माळेगाव यात्रा ही शेतकरी व कष्टकरी वर्गाची यात्रा असून पशुधनासाठी प्रसिद्ध आहे. त्यामुळे पशुपालकांचा सन्मान होणे आवश्यक असल्याचे सांगत, त्याच उद्देशाने बक्षीस रकमेत वाढ करण्यात आल्याचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाची सुरुवात राजमाता गोमातेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर पशुसंवर्धन विभागाच्या ध्वजारोहणाचे मान आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आले. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमास औपचारिक प्रारंभ झाला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रवीणकुमार घुले यांनी केले.

## माळेगाव यात्रेत स्वच्छतेवर भर

नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)

श्रीक्षेत्र माळेगाव येथे खंडोबाच्या यात्रेनिमित्त जिल्हा प्रशासनाच्या वतीने भाविकांच्या सोयीसाठी विविध मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असून, यामध्ये स्वच्छतेस विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. यंदा माळेगाव यात्रेत एकूण पाच फिरती शौचालये तसेच दहा सार्वजनिक शौचालयांची सुविधा भाविकांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. यात्रा परिसरातील प्रमुख ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात फिरती शौचालये उभारण्यात आली असून नांदेड बसस्टँड परिसरात दोन, लावणी महोत्सव परिसरात एक, लातूर बसस्टँड येथे एक तसेच परभणी बसस्टँड परिसरात एक अशी एकूण पाच फिरती शौचालये कार्यान्वित करण्यात आली आहेत. प्रत्येक फिरत्या शौचालय युनिटमध्ये दहा शौचालय सीट्स असून त्यामध्ये पाच महिलांसाठी व पाच पुरुषांसाठी व्यवस्था करण्यात आली आहे.

## इंद्रायणी आरती कोनशीलेचे लोकार्पण उत्साहात



आळंदी : (समर्थ गांवकरी)

आळंदी येथील इंद्रायणी आरती सेवा समितीचे वतीने नित्य नैमित्तीक एकादशी दिनी इंद्रायणी आरती उत्साहात करण्यात आली. यावेळी पुणे जिल्हा वारकरी सेवा महामंडळ अध्यक्ष विलास तात्या बालवाडकर यांचे हस्ते इंद्रायणी आरतीचे कोनशीलेचे पूजन पुष्पहार अर्पण करीत लोकार्पण करण्यात आले. सौरभ शिंदे, संयोजक राजमाता जिजाऊ महिला प्रतिष्ठान अध्यक्षा अनिता झुजम, आळंदी जनहित फाउंडेशन कार्याध्यक्ष संयोजक अर्जुन मेदनकर, माजी उपनगराध्यक्ष सागर भोसले, महादेव पाखरे रोहिदास कदम, बाबासाहेब भंडारे, भागवत शेजूळ, शोभा कुलकर्णी, सरस्वती भागवत, नीलम कुरधोंडकर, अलका परदेशी, काशीबाई आडकणे, जयश्री भागवत, सुनिता निळे, सुरेखा कुऱ्हाडे, सखुबाई मुंडे, सरस्वती भागवत, लता वर्तले, पुष्पा लेंडगर, कौशल्या देवरे, सुरेखा काळभोर, मयुरी कदम, सुवर्णा काळे, मेघा काळे, संगीता चव्हाण, ज्ञानेश्वर घुंडरे, शिवसेना शहर प्रमुख राहुल चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

## सामाजिक बांधिलकी जपत अक्षय जाधव यांचा वाढदिवस साजरा



भिवंडी : (समर्थ गांवकरी)

आपण समाजाचं काहीतरी देणं लागतो आणि आपल्या हातातून नेहमीचं सामाजिक कार्य घडत रहावं या भावनेने भिवंडी तालुक्यातील पडघा केंद्रातील जिल्हा परिषद समतानगर, बोरीवली जिल्हा परिषद मराठी शाळेत समतानगर येथिल राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी भिवंडी तालुका ग्रामीणचे उपाध्यक्ष अक्षय दादाराम जाधव यांनी विद्यार्थ्यांना केक, बिस्किट ,पेन्सिल वाटप करून सामाजिक बांधिलकीने आपला वाढदिवस साजरा केला आहे. यावेळी मुख्याध्यापिका उषा जाधव, पत्रकार मिलिंद जाधव उपस्थित होते.

### मैनावी कॉर्पोरेशन, जपान आणि ब्लूम व्हेंचर्स यांच्या नेतृत्वाखालील विरोहण'ची 65 कोटी ($7.5 M) चालू सिरीज बी'च्या साह्याने

## सुलभ, प्रभावी आरोग्यसेवा शिक्षणाच्या दिशेने एक मोठी झेप

नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)

VIROHAN

विरोहण हा आरोग्यसेवा शिक्षणातील भारताचा अग्रगण्य मातब्बर असून मैनावी कॉर्पोरेशन यांच्या नेतृत्वाखालील चालू सिरीज बी'च्या निधी फेरीचा भाग म्हणून रु. 65 कोटी ($7.5 मिलियन) उभे केले. या फेरीमध्ये ब्लूम व्हेंचर्स, भारत इन्क्लुसिव्ह टेक्नॉलॉजीज सीड फंड आणि रिब्राइट पार्टनर्ससह विरोहणच्या विद्यमान गुंतवणुकदारांचाही सहभाग दिसून आला. या निधीमुळे उत्पादन नवोन्मेष, कामकाज क्षमता आणि धोरणात्मक प्रतिभा विस्तार याद्वारे विरोहणच्या नफ्याला चालना मिळेल. यूपीईएस (डेहरादून), बीबीडी युनिव्हर्सिटी (लखनऊ), सीएमआर युनिव्हर्सिटी (बंगळुरू), आसाम डॉन बॉस्को युनिव्हर्सिटी (गुवाहाटी) MIT युनिव्हर्सिटी (शिलॉंग) जी.एच. रायसोनी युनिव्हर्सिटी (नागपूर आणि पुणे) सिल्व्हर ओक युनिव्हर्सिटी (अहमदाबाद) आणि इतर अनेक काही संलग्न आरोग्यसेवा, नर्सिंग आणि आरोग्यसेवा व्यवस्थापनात श्रेणीतील सर्वोत्तम पदवी अभ्यासक्रम उपलब्ध करून देसाठी. उद्योगाच्या बाजूने, ते लेन्सकार्ट, मेदांता, हेल्थियन्स, डॉ. लाल पॅथलॅब्स आणि इतर अनेकांसह उच्च आरोग्य सेवा संस्थांसह काम करते. त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी एक मजबूत शिक्षण-ते-रोजगार मार्ग तयार करते. सन 2018 मध्ये स्थापना झाल्यापासून, विरोहण'च्या मॉडेलने मजबूत परिणाम दिले आहेत- उद्योग भागीदार म्हणून 20 हून अधिक उच्च शिक्षण संस्थांशी भागीदारी करणे,जवळपास 13,000 हून अधिक महत्वाकांक्षी आरोग्यसेवा व्यावसायिक तयार करणे तसेच पदवीधर पहिल्या दिवसापासून करिअरसाठी तयार असल्याची सुनिश्चितता करण्यासाठी 2,000 हून अधिक आरोग्यसेवा क्षेत्रातील नियोक्ते (मालक) सहकार्य करणे.

या घोषणेवर बोलताना विरोहण'चे सीईओ कुणाल दूडेजा म्हणाले: "आरोग्य सेवा प्रणाली कुशल व्यावसायिकांच्या बळावर चालते, तरीही शिक्षण आणि रोजगार यांच्यात असलेल्या दरीमुळे लाखो नियुक्त्या अपूर्ण राहतात. उच्च शिक्षण संस्थांसाठी उद्योग भागीदार म्हणून ही तफावत मोठ्या प्रमाणात कमी करणे हे विरोहण' मध्ये आमचे ध्येय आहे. नवीन तसेच परतणाऱ्या गुंतवणुकदारांच्या या पाठिंब्यामुळे आम्हाला तंत्रज्ञान दुप्पट करता येते, आमच्या भागीदारीचा विस्तार करता येतो आणि विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या संधी खुल्या करता येतात. सन 2030 पर्यंत, आम्ही दहा लाख विद्यार्थ्यांना प्रभावित करण्याचे आणि भारत आणि परदेशातील संलग्न आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांचा कणा बनण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे."


मैनावी इंडिया'चे मॅनेजिंग डायरेक्टर हिडेकाझू इतो पुढे म्हणाले: "भारत आणि जगभरात कुशल आरोग्यसेवा व्यावसायिकांची मागणी अभूतपूर्व गतीने वाढत आहे; त्याचप्रमाणे तंत्रज्ञान, उद्योग-संरेखित शिक्षण आणि मजबूत संस्थात्मक भागीदारी एकत्र आणणाऱ्या विरोहण'च्या मॉडेलमध्ये आरोग्यसेवा शिक्षण मोठ्या प्रमाणात कसे दिले जाते याची व्याख्या नव्याने करण्याची क्षमता आहे.

जपानी बाजारपेठेतील आमच्या मनुष्यबळ व्यवसायाच्या माध्यमातून लोकांच्या आयुष्यातील टर्निंग पॉइंट आणि करियरमधील संक्रमणांना पाठिंबा देत, आम्ही मैनावीमध्ये उद्देश-आधारित संस्कृतीसह वाढलो आहोत. भारतीय संदर्भात, आम्ही मनुष्यबळ आणि शिक्षण क्षेत्रातील गंभीर आव्हानांचा सामना करण्यावर लक्ष केंद्रित करत आहोत. आमचा ठाम विश्वास आहे की विरोहण'च्या शाश्वत वाढीमुळे अर्थपूर्ण सामाजिक परिणाम निर्माण होतील आणि या प्रमुख समस्यांचे निराकरण करण्यात मदत होईल." हा मापदंड गाठत, 'विरोहण' भारतातील आरोग्यसेवा शिक्षण आणि मनुष्यबळ विकासाच्या पुढील दशकाला आकार देण्यासाठी सज्ज आहे- अभ्यासाचे वर्ग आणि कारकीर्द यांच्यात एक मजबूत मार्ग तयार करत आहे.

# 'केएसएच ग्रुप'ला 'ग्रेट प्लेस टू वर्क' प्रमाणपत्र

## लोक आणि संस्कृतीप्रति ५०हून अधिक वर्षांच्या वचनबद्धतेवर शिक्कामोर्तब

पुणे : (समर्थ गांवकरी)



पुरवठा साखळी (सप्लाय चेन) उद्योगात मजबूत स्थितीत कार्यरत असलेल्या, वैविध्यपूर्ण व्यवसायातील आघाडीच्या 'केएसएच ग्रुप'ने भारतातील अत्यंत प्रतिष्ठेच्या 'ग्रेट प्लेस टू वर्क (जीपीटीडब्ल्यू) प्रमाणपत्र मिळाल्याची घोषणा नुकताच केली. या प्रमाणपत्रात केएसएच इंटिग्रेटेड लॉजिस्टिक्स, केएसएच डिस्ट्रीपार्क्स आणि केएसएच इन्फ्रा आदी त्यांच्या तीनही मुख्य लॉजिस्टिक्स संस्थांचा समावेश आहे.

'ग्रेट प्लेस टू वर्क' (जीपीटीजब्ल्यू) असे या पुरस्काराचे अधिकृत नाव असून हा पुरस्कार जारी करणारी संस्थाही 'ग्रेट प्लेस टू वर्क' आहे. हा प्रतिष्ठेचा सन्मान कर्मचारी सर्वेक्षणातून (सर्टिफिकेशन सर्वे) मिळालेल्या कठोर अभिप्राय आणि केएसएच ग्रुपने भारतात 'ग्रेट प्लेस टू वर्क सर्टिफाइड होण्यासाठी आवश्यक निकष पूर्ण केल्याची पुष्टी यावर आधारित आहे.

'केएसएच ग्रुप' संस्थेने जीपीटीडब्ल्यू (ग्रेट प्लेस टू वर्क) प्रमाणपत्र मिळवले, कारण त्यांनी एकत्रितपणे एक मजबूत संस्कृती निर्माण केली, ही एक अशी संस्कृती आहे, ज्यात विश्वासार्हता, आदर, काळजी आणि कर्मचाऱ्यांबद्दल अभिमान आहे. 'केएसएच ग्रुप'मध्ये कामाच्या ठिकाणी मोकळेपणाने बोलता येते, सगळ्यांना सारखी वागणूक मिळते,

प्रत्येक कर्मचाऱ्याला आपण महत्त्वाचे आहोत असे वाटते, सगळेजण एकमेकांना सहभागी करून घेतात आणि आपल्या कामासाठी पूर्ण पाठिंबा मिळतो जेणेकरून ते त्यांचे सर्वोत्तम काम करू शकतील.

कंपनीचा ५०हून अधिक वर्षांचा वारसा सचोटी, ग्राहक-केंद्रितता, कार्यात्मक उत्कृष्टता आणि लोकांप्रति असलेल्या खोल बांधिलकीच्या मूल्यांवर आधारित आहे. हा पुरस्कार त्या वारशाचे एक शक्तिशाली प्रतिबिंब आहे, जे दर्शवून देते की संस्थापकांचे एक विश्वासार्ह, नैतिक आणि उच्च-कार्यक्षम संस्था निर्माण करण्याचे स्वप्न आजही या समूहाच्या कृतींना मार्गदर्शन करत आहे.

ही स्वीकृती (मान्यता) या गोष्टीवर शिक्कामोर्तब करते की, काळानुसार गट (समूह) विकसित होत असतानाही, तो विश्वास, शिस्त आणि दीर्घकालीन विचारांच्या संस्कृतीमध्ये रुजलेला आहे. हे सिद्ध करते की, त्यांच्या चिरस्थायी (कायम टिकणाऱ्या) मूल्यांचे केवळ जतन केले जात नाही, तर ती मूल्ये सक्रियपणे जगली (आचरणात आणली) जातात, ज्यामुळे एक मजबूत, सुसंगत आणि भविष्यासाठी सज्ज कार्यस्थळ आणि व्यवसाय घडत आहे.

गेल्या वर्षभरात 'केएसएच ग्रुप'ने आपल्या कर्मचारी वर्ग आणि पायाभूत सुविधांमध्ये मोठी गुंतवणूक केली आहे : विविध विभागांमध्ये एकूण ४०० प्रशिक्षणाचे तास पूर्ण झाले.

कर्मचाऱ्यांची सुरक्षा वाढवण्यासाठी नवीन धोरणे लागू करण्यात आली, तसेच लैंगिक छळ प्रतिबंध (पीओएसएच) आणि इतर अनिवार्य सत्रांविषयी नियमित जागरूकता कार्यक्रम आयोजित केले गेले.

# एसएसआय मंत्रासाठी एफडीए ५१०(के) अर्ज दाखल

पुणे : (समर्थ गांवकरी)

भारतातील स्वदेशी सर्जिकल रोबोटिक्स क्षेत्रातील अग्रणी कंपनी एसएस इनोवेशन्स इंटरनॅशनल, आयएनसी. (नॅस्डॅक: एसएसआयआय) ने आज एक ऐतिहासिक टप्पा गाठल्याची घोषणा केली. कंपनीने आपल्या नेक्स्ट-जनरेशन एसएसआय मंत्रा सर्जिकल रोबोटिक सिस्टीमसाठी अमेरिकेच्या अन्न व औषध प्रशासनाकडे (एफडीए) ५१०(के) प्रीमार्केट नोटिफिकेशन सादर केले आहे. हे सबमिशन ५ डिसेंबर २०२५ रोजी पूर्ण झाले असून, यामध्ये जनरल सर्जरी, युरोलॉजी, कोलोरेक्टल, गायनॅकोलॉजी आणि कार्डियक अशा उच्च मागणी असलेल्या शस्त्रक्रिया विशेषतांचा समावेश आहे.



हा टप्पा भारतीय विकसित सर्जिकल रोबोटिक प्लॅटफॉर्मने उचललेला आतापर्यंतचा सर्वात महत्त्वाचा जागतिक नियामक टप्पा मानला जात असून, दीर्घकाळ आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या वर्चस्वाखाली असलेल्या या क्षेत्रात भारताला ठळक स्थान मिळवून देणारा आहे. एसएस इनोवेशन्सचे संस्थापक, अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुधीर श्रीवास्तव म्हणाले, "एफडीएकडे ५१०(के) नोटिफिकेशन सादर करणे हे केवळ एसएस इनोवेशन्ससाठीच नव्हे, तर प्रगत वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताच्या जागतिक नेतृत्वाच्या उदयासाठीही एक निर्णायक क्षण आहे. एसएसआय मंत्रा ही प्रणाली परवडणारी, सुलभ आणि तांत्रिकदृष्ट्या वेगळी असावी या उद्देशाने विकसित करण्यात आली आहे. विविध भौगोलिक भागांतील तिची सिद्ध कामगिरी तिच्या क्षमतेची साक्ष देते. विशेषतः वंचित समुदायांना सेवा देणाऱ्या रुग्णालयांना जागतिक दर्जाचा आणि किफायतशीर असा पर्याय यामुळे मोठ्या प्रमाणावर लाभदायक ठरेल, असा आम्हाला विश्वास आहे." एफडीएसोबत झालेल्या प्री-सबमिशन बैठका आणि सविस्तर चर्चेनंतर, कंपनीने डी नोवो अर्जाऐवजी ५१०(के) मार्ग स्वीकारण्याचा निर्णय घेतला, ज्यामुळे तुलनेने जलद आणि कार्यक्षम मंजुरी प्रक्रियेचा लाभ मिळू शकतो. एफडीए कडून ५१०(के) सबमिशनसाठी लक्ष्य पुनरावलोकन कालावधी ९०दिवसांचा असतो, मात्र एकूण पुनरावलोकन कालावधी बदलू शकतो. याचबरोबर, एसएस इनोवेशन्स युरोपियन युनियनमध्ये सीई मार्किंग मिळविण्याच्या दिशेनेही प्रगती करत असून, त्याची अपेक्षा २०२६ च्या पहिल्या सहामाहीत आहे.

# सणासुदीत फ्लिपकार्टची दमदार कामगिरी

■ लाखो रोजगार, वेगवान पुरवठा साखळीने अर्थचक्राला चालना

पुणे: (समर्थ गांवकरी)

सणासुदीच्या काळात स्वदेशी ई-व्यवहार क्षेत्रातील आघाडीची कंपनी फ्लिपकार्टने आपल्या मजबूत पुरवठा साखळीच्या जोरावर देशभरात विक्रमी व्यवहारांची पूर्तता केली आहे. यंदाच्या उत्सवी मोसमात कंपनीच्या एकूण व्यवहारांमध्ये मोठी वाढ नोंदवली गेली असून, विशेष बाब म्हणजे साठ टक्क्यांहून अधिक ऑर्डर्स दुसऱ्या व तिसऱ्या स्तरातील शहरांमधून प्राप्त झाल्या. यामुळे महानगरांबाहेरील भागांमध्ये डिजिटल खरेदीकडे वाढणारा कल आणि ग्राहकांचा वाढता आत्मविश्वास स्पष्ट झाला आहे.




वाढती मागणी आणि व्यवहारांचा ताण समर्थपणे पेलण्यासाठी फ्लिपकार्टने देशातील अठ्ठावीस राज्यांमध्ये चार लाखांहून अधिक हंगामी रोजगाराच्या संधी निर्माण केल्या. या रोजगारांमुळे स्थानिक युवकांना तात्पुरतेच नव्हे तर कौशल्यवृद्धीच्या माध्यमातून दीर्घकालीन संधीही उपलब्ध झाल्या. अनेक ठिकाणी प्रथमच रोजगार मिळालेल्या तरुणांचा यामध्ये मोठा सहभाग होता, ज्यामुळे ग्रामीण आणि निमशहरी भागातील अर्थचक्राला चालना मिळाली. उत्सवी गर्दीच्या दिवसांत फ्लिपकार्टने आपल्या तंत्रज्ञानाधारित व्यवस्थेच्या सहाय्याने प्रति मिनिट पाच हजारांहून अधिक पाठवणुकांची हाताळणी केली. एका दिवसात सव्वासात दशलक्षांहून अधिक ऑर्डर्स वेळेत ग्राहकांपर्यंत पोहोचविण्याची क्षमता कंपनीने दाखवून दिली. आधुनिक साठा व्यवस्थापन, वाहतूक नियोजन आणि स्थानिक वितरण केंद्रांच्या जाळ्यामुळे शहरांसह दुर्गम भागांपर्यंत जलद सेवा देणे शक्य झाले. महानगरांबाहेरील बाजारपेठांमध्ये घरगुती साहित्य, लहान फर्निचर, स्वयंपाकघरातील उपकरणे आणि दैनंदिन वापराच्या वस्तूंना मोठी मागणी दिसून आली.

# गुणदर्शन स्पर्धेत प्राथमिक केंद्र शाळा चांदा प्रथम

चांदा : (समर्थ गांवकरी)

नेवासा तालुक्यातील चांदा येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेत विविध गुणदर्शन स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे .यामध्ये एकूण २० शाळेनी सहभाग नोंदवला होता . या स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चांदा या शाळेला केंद्रस्तरीय स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे यामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम लहान गटात आराध्या संतोष भालके वेशभूषा प्रथम क्रमांक बालगट, नम्रता दत्तात्रय चौधरी वैयक्तिक गीत गायन प्रथम क्रमांक बालगट वैयक्तिक गीत गायन आराध्या बाबासाहेब पासलकर क्रमांक दुसरा किलबिल गट , तर वेशभूषा सादरीकरण स्पर्धेत आराध्या बाबासाहेब पासलकर द्वितीय क्रमांक किलबिल गट , वर्षा दहातोंडे कथा सादरीकरण बालगट तृतीय क्रमांक , व समूह गीत गायन लहान गटात तृतीय क्रमांक आला आहे.

# एथर एनर्जी ऑटो इन्शुरन्स वितरण क्षेत्रात प्रवेश करणार

मुंबई : (समर्थ गांवकरी)

एथर एनर्जी या भारतातील एका आघाडीच्या इलेक्ट्रिक दुचाकी उत्पादक कंपनीने आज ऑटो इन्शुरन्स सेवा क्षेत्रात दाखल होण्याच्या आपल्या योजनेची पुष्टी केली. यासाठी कंपनी एक संपूर्ण मालकी असलेली साहाय्यक कंपनी स्थापन करेल जी एक कॉर्पोरेट एजंट प्रमाणे या क्षेत्रात काम करेल.वाहन मालकीचा अनुभव अधिक निर्बाध बनवण्यासाठी ही नवीन कंपनी विविध विमा कंपन्यांशी भागीदारी करून देशभरातील आपल्या ग्राहकांना ऑटो इन्शुरन्स पॉलिसी ऑफर करण्यावर लक्ष केंद्रित करेल.

या साहाय्यक कंपनीच्या स्थापनेमुळे एथरला आपल्या इन्शुरन्स ऑफरिंग्ज सुव्यवस्थित करण्यात, ग्राहक अनुभव वाढवण्यात आणि आपल्या



वर्तमान यूझर बेसचा फायदा घेऊन एक निरंतर उत्पन्नाचा ओघ जनरेट करण्यात मदत होईल. या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून, विविध इन्शुरन्स भागीदारांसोबत काम करण्याचा एथरचा मानस आहे. वितरण स्वतःकडे ठेवून एथर एव-विशिष्ट विमा उत्पादनांमध्ये नविण्यापूर्णता आणू शकेल, विम्याचे नविनीकरण सोपे करू शकेल आणि कालांतराने संबंधित दरांमध्ये काही सुधारणा देखील करू शकेल. प्रस्तुत घोषणेविषयी बोलताना एथर एनर्जीचे चीफ बिझनेस ऑफिसर श्री. रवनीत सिंह फोकेला म्हणाले, "आमचे हे पहिल्यापासून मानणे आहे की, मालकीचा उत्तम अनुभव त्या वाहनाच्या पलीकडे जाणारा असतो. आज या प्रवासात विमा हा एक महत्त्वाचा भाग आहे. आणि हे असे क्षेत्र आहे, जेथे ग्राहकांसाठी अनुभव लक्षणीयरित्या सोपा करता येऊ शकतो. विमा वितरणाचे काम एथर ईकोसिस्टममध्ये समाविष्ट करून आम्ही ते अधिक सुलभ, पारदर्शक आणि आमचे ग्राहक त्यांचे वाहन कसे वापरतात याच्याशी संबद्ध करू शकतो. कालांतराने, आमच्यात ही क्षमता येऊ शकते की, पारंपरिक रचना स्वीकारण्याऐवजी आम्ही EV च्या वास्तविक वापरानुरूप ऑटो इन्शुरन्स डिझाईन करण्यासाठी भागीदारांसोबत काम करू शकू. आमच्या मुख्य ऑफरिंगला पूरक ठरणारी आणि व्यवसायासोबत वाढत जाणारी क्षमता विकसित करताना मालकीचा अनुभव अधिक उन्नत करण्याच्या उद्दिष्टाने हे एक मोजून मापून आणि जाणीवपूर्वक टाकलेले पाऊल आहे." एथरचा विस्तृत ग्राहक-बेस पाहता, हा कंपनीने केलेला स्वाभाविक विस्तार आहे. हा प्लॅटफॉर्म एथरच्या विद्यमान यूझर्सना सेवा देईल त्यामुळे ग्राहक मिळवण्याचा अतिरिक्त खर्च यात नाही. तसेच हा प्लॅटफॉर्म मर्यादित गुंतवणुकीसह स्थिरपणे वाढते उत्पन्न देईल अशी अपेक्षा आहे.

# आयबीएम ने 2030 पर्यंत भारतातील 50 लाख तरुणांना एआय, सायबरसिक्युरिटी आणि क्वांटम क्षेत्रात प्रशिक्षित देण्याचे आश्वासन दिले

नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)

आयबीएम ने आज 2030 पर्यंत भारतातील 50 लाख विद्यार्थ्यांना आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय), सायबरसिक्युरिटी आणि क्वांटम कम्प्युटिंग या क्षेत्रांत कौशल्य प्रशिक्षण देण्याची आपली वचनबद्धता जाहीर केली आहे. ही योजना आयबीएम स्किल्सबिल्ड कार्यक्रमाद्वारे राबवली जाईल. याचा उद्देश समान संधी असलेले, भविष्यासाठी तयार कार्यबल तयार करणे आणि विद्यार्थ्यांसह प्रौढ शिकणाऱ्यांना प्रगत डिजिटल कौशल्ये आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आहे. या उपक्रमांतर्गत आयबीएम शाळा, महाविद्यालये आणि व्यावसायिक तसेच कौशल्य प्रशिक्षण संस्थांमध्ये एआय आणि नव्या तंत्रज्ञानाचे शिक्षण वाढवणार आहे. यासोबतच ऑल इंडिया कॉन्सिल



फॉर टेक्निकल एज्युकेशन (एआयसीटीई) सारख्या संस्थांसोबत सहकार्य करून प्रत्यक्ष अनुभवावर आधारित एआय शिक्षण, प्राध्यापक प्रशिक्षण, अभ्यासक्रमात सुधारणा, हॅकाथॉन आणि इंटर्नशिप्स आयोजित केल्या जातील. आयबीएमचे चेअरमन, प्रेसिडेंट आणि सीईओ अरविंद कृष्णा म्हणाले,"एआय आणि क्वांटम क्षेत्रात जगात आघाडी मिळवण्याची क्षमता आणि महत्त्वाकांक्षा भारताकडे आहे. या प्रगत तंत्रज्ञानातील कौशल्ये आर्थिक स्पर्धा, वैज्ञानिक प्रगती आणि सामाजिक परिवर्तन ठरवतील. 50 लाख लोकांना कौशल्य प्रशिक्षण देण्याची आमची वचनबद्धता ही भविष्यातील गुंतवणूक आहे. प्रगत कौशल्यांपर्यंत सर्वांना समान संधी उपलब्ध करून देऊन आम्ही युवकांना आणि विद्यार्थ्यांना नवकल्पना करण्यास, नवनवीन शोध लावण्यास आणि भारताच्या विकासाला गती देण्यास सक्षम करत आहोत." आयबीएम शालेय स्तरावरही तयारी मजबूत करण्याचे काम सुरू ठेवत आहे. यासाठी त्यांनी वरिष्ठ माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी एआय अभ्यासक्रम तयार केला आहे आणि शिक्षकांसाठी एआय प्रोजेक्ट कुकबुक, टीचर हँडबुक आणि स्पष्टीकरणात्मक मॉड्यूल्स यांसारखी साधने उपलब्ध करून दिली आहेत. या कार्यक्रमांचा उद्देश लहान वयातच संगणकीय विचारसरणी आणि जबाबदार एआय तत्त्वे शिकवणे, तसेच शिक्षकांना आत्मविश्वासाने आणि मोठ्या प्रमाणावर एआय शिक्षण देण्यासाठी सक्षम करणे हा आहे.

आयबीएम स्किल्सबिल्ड या उपक्रमाचा मुख्य भाग आहे. हे जगातील सर्वात सोप्या पद्धतीने उपलब्ध होणारे तंत्रज्ञान शिक्षणाचे व्यासपीठ आहे. या कार्यक्रमात एआय, सायबरसिक्युरिटी, क्वांटम, क्लाउड, डेटा, सस्टेनेबिलिटी आणि कामासाठी आवश्यक कौशल्यांसह 1,000 हून अधिक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. जे विद्यार्थ्यांसाठी, शिक्षकांसाठी आणि संस्थांसाठी उपयुक्त आहेत. जगभरात 1.6 कोटींहून अधिक लोकांनी याचा लाभ घेतला आहे.

# संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथी साजरी

वाखारी (समर्थ गांवकरी)

देवळा तालुक्यातील वाखारी येथे श्री संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी संताजी जगनाडे महाराजांच्या प्रतिमेचे विधीवत महापूजा करून पुष्पहार अर्पण करण्यात आला तसेच अनोख्या पद्धतीने टाळा मृदंगाच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली यावेळी देवळा बाजार समितीचे माजी सभापती योगेश आहेर मधुकर जाधव संभाजी शेजवळ प्रकाश जाधव वंसत जाधव विश्वनाथ जाधव चंद्रकात जाधव पोपट जाधव नंदकिशोर जाधव विलास जाधव मुन्नाभाई जाधव बापु जाधव सोमनाथ जाधव राकेश जाधव राजेद्र जाधव श्रावण जाधव आदींसह महिला ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नेक्सस वेस्टएंड'तर्फे 'नेक्सस गेम व्हर्स'चे आयोजन

पुणे : (समर्थ गांवकरी)

यंदाच्या ख्रिसमस आणि सुट्ट्यांच्या हंगामात औंध येथील 'नेक्सस वेस्टएंड' तर्फे 'नेक्सस गेम व्हर्स'चे आयोजन करण्यात आले आहे. १३ डिसेंबर पासून २६ जानेवारी पर्यंत चालणारे हे 'इमर्सिव्ह गेमिंग हब' एकाच छताखाली विविध इंटरॅक्टिव्ह अनुभव देणार असून, कुटुंबीय, मित्रमंडळी आणि आप्तेष्टांसोबत सणाचा आनंद साजरा करण्यासाठी हे एक खास आकर्षण ठरणार आहे.

या उपक्रमातील मुख्य आकर्षण म्हणजे 'ह्युमन क्लॉ मशिन' होय. पारंपरिक क्लॉ गेमला नव्या अंदाजात सादर करणारा, प्रथमच अनुभवता येणारा हा प्रकार आहे. सहभागी व्यक्तींना सुरक्षितरीत्या हार्नेसमध्ये बांधून बक्षिसांनी भरलेल्या पिटमध्ये खाली उतरवले जाते, तेथे ते भेटवस्तूंची लयलूट करतात. प्रत्येक जण काही ना काही बक्षीस




घेऊनच परत येईल, याची व्यवस्था करण्यात आली आहे. ख्रिसमस सेलिब्रेशनदरम्यान काहीतरी थरारक आणि अविस्मरणीय अनुभव शोधणाऱ्या कुटुंबांसाठी आणि गेमिंग प्रेमींसाठी हा उपक्रम विशेष आकर्षण ठरणार आहे.

यासोबतच 'नेक्सस गेम व्हर्स' मध्ये खास 'गेमिंग अरेना' उभारण्यात आला असून, तो लहान मुलांपासून प्रौढांपर्यंत सर्वांसाठी खुला आहे. येथे चार रोमांचक आणि स्पर्धात्मक खेळांचा अनुभव घेता येणार असून, सणासुदीच्या कुटुंबीय सहलींसाठी हे एक परिपूर्ण ठिकाण ठरणार आहे. 'व्हिजिटर व्हीआर टँक गेममध्ये व्हर्च्युअल रणांगणावर टँक युद्धाचा थरार अनुभवू शकतील;

तसेच 'हॅमर गिटार' या संगीताधारित खेळात ताल, वेळेचे भान आणि रिफ्लेक्सेस तपासू शकतात. 'क्रॅक शॉट' च्या वेगवान खेळात अचूकता आणि एकाग्रतेचे कौशल्य दाखवू शकतात आणि व्हीआर शुटिंगमध्ये अॅक्शनने भरलेल्या आभासी जगात रोमांचक साहसांचा अनुभव घेऊ शकतात.

# ज्युपिटर हॉस्पिटल, पुणे येथे मोटराइज्ड TAVI प्रक्रिया यशस्वी

पुणे: (समर्थ गांवकरी)

पुणे शहरासाठी हा अभिमानाचा क्षण आहे. बाणेर येथील ज्युपिटरहॉस्पिटलमधील स्ट्रक्चरल हार्ट टीमने गंभीर एऑर्टिक स्टेनोसिसअसलेल्या रुग्णावर अत्याधुनिक मोटराइज्ड TAVI (TranscatheterAortic Valve Implantation) ही हृदयाची महत्वाची प्रक्रियायशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. या यशामुळे जागतिक दर्जाची हृदय-उपचारसुविधा आता पुण्यातच उपलब्ध होत असल्याचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठलागेला आहे.

ही प्रक्रिया पर्पल मायक्रोपोर्ट कंपनीच्या विटाफ्लो लिबर्टी याअत्याधुनिक, मोटराइज्ड प्रणालीच्या मदतीने करण्यात आली. या नव्यातंत्रज्ञानामुळे डॉक्टरांना कृत्रिम एऑर्टिक व्हॉल्व्ह अचूक ठिकाणीबसवताना अधिक नियंत्रण आणि नेमकेपणा मिळतो. TAVI प्रक्रियेतछाती उघडण्याची किंवा हृदय थांबवण्याची गरज नसते; फक्त मांडीजवळछोट्या छिद्रातून प्रक्रिया केली जाते. त्यामुळे रुग्णाला कमी त्रास होतोआणि पुनर्प्राप्तीही जलद होते—हे पारंपरिक ओपन-हार्ट शस्त्रक्रियेपेक्षाखूपच सोपे ठरते.

गंभीर एऑर्टिक स्टेनोसिस ही जीवघेणी स्थिती ठरू शकते. यातहृदयातील एऑर्टिक झडप अरुंद होते आणि हृदयातून शरीरात जाणाऱ्यारक्तप्रवाहात अडथळा निर्माण होतो. अनेक वृद्ध रुग्ण किंवा जटिलआरोग्यस्थिती असलेले रुग्ण मोठी शस्त्रक्रिया करण्यासाठी योग्यनसतात. अशा रुग्णांसाठी हे आधुनिक तंत्रज्ञान आता पुण्यात उपलब्धझाल्याने सुरक्षित उपचार व लवकर सामान्य जीवनात परतण्याची आशा वाढली आहे.

# अर्थव्यवस्थेच्या मजबुतीसाठी बौद्धिक संपदेचे संवर्धन गरजेचे

## अभय दफ्तरदार यांचे प्रतिपादन; 'एआयसी पिनॅकल' तर्फे तिसऱ्या राष्ट्रीय बौद्धिक संपदा (आयपी) यात्रेचे उद्घाटन

पुणे : (समर्थ गांवकरी)

देशातील नवोन्मेषाधारित अर्थव्यवस्थेला बळ देण्यात सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचा (एमएसएमई) मोलाचा वाटा असून, या क्षेत्रातील बौद्धिक संपदा हक्क (आयपीआर) नोंदणीमध्ये २०२१ ते २०२५ या कालावधीत सुमारे ४० टक्के वाढ झाली आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेला अधिक मजबूत करण्यासाठी राष्ट्रीय बौद्धिक संपदेचे संवर्धन करणे गरजेचे असून, सर्व लहान-मोठ्या उद्योजकांनी आयपी, पेटंट नोंद करावे," असे प्रतिपादन केंद्र सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) मंत्रालयाचे सहायक संचालक अभय दफ्तरदार यांनी केले.



केंद्रीय सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाच्या सहकार्याने एआयसी-पिनॅकल आंत्रप्रेन्युअरशीप फोरमच्या वतीने आयोजित दोन दिवसीय तिसऱ्या राष्ट्रीय बौद्धिक संपदा (आयपी) यात्रेचे उद्घाटन अभय दफ्तरदार यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला एमएसएमई उद्योजक, स्टार्टअप्स, तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यावसायिक, कायदेविषयक तज्ज्ञ, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

पुणे स्टेशन येथील हॉटेल लेमन ट्री प्रीमियर येथे आयोजित कार्यक्रमावेळी पेटंट्स अँड डिझाइन्स विभागाचे सहायक नियंत्रक प्रतिक हेंद्रे, आयपीआर तज्ज्ञ वेदांत पुजारी, मॅक्लियोड फार्माच्या मानसी पाध्ये, टाटा मोटर्सचे मोहम्मद फैजल, वरिष्ठ आयपी व्यावसायिक प्रियंका कुलकर्णी, एआयसी-पिनॅकल आंत्रप्रेन्युअरशीपचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील धाडीवाल, व्यवस्थापक शादाब हुसेन आदी उपस्थित होते. तज्ज्ञांनी पेटंट, ट्रेडमार्क, कॉपीराइट, औद्योगिक डिझाइन आणि उद्योगाभिमुख आयपी धोरणावर मार्गदर्शन केले.

अभय दफ्तरदार म्हणाले, "देशाच्या जीडीपीमध्ये एमएसएमई क्षेत्राचा सुमारे ३० टक्के, उत्पादन क्षेत्रात ४५ टक्के, तर निर्यातीत ३५ ते ४० टक्के इतका वाटा आहे. इतक्या मोठ्या योगदानाच्या पार्श्वभूमीवर नवोन्मेष, बौद्धिक संपदा संरक्षण आणि संशोधन-विकास यांच्या माध्यमातून एमएसएमईंना सक्षम करणे अत्यावश्यक आहे. एमएसएमईंना भेडसावणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन मंत्रालय आयपीविषयी जनजागृती, सुलभ नोंदणी प्रक्रिया आणि बौद्धिक संपदेच्या व्यापारीकरणावर भर देत आहे.

उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमधील सहकार्य महत्त्वाचे असल्याचे सांगताना त्यांनी स्पष्ट केले की, संशोधनातून निर्माण होणाऱ्या कल्पनांचे बाजाराभिमुख रूपांतर होणे गरजेचे आहे. आयपी संरक्षणातूनच मूल्यनिर्मिती आणि उद्योगवाढ साध्य होऊ शकते," असे त्यांनी नमूद केले.

प्रतीक हेंद्रे म्हणाले, "नवकल्पनेचे रूपांतर व्यवसायात होण्यापर्यंतचा प्रवास सुरळीत होण्यासाठी पेटंट आणि डिझाईन प्रमाणित करणे गरजेचे आहे. विभागामार्फत पेटंटप्रक्रिया अधिक सुलभ करण्यावर भर दिला जात आहे. गेल्या वर्षभरात पेटंट आणि डिझाईन फायलिंगमध्ये ३५ ते ४० टक्के वाढ झाली आहे."

आयपीविषयी जागरूकता निर्माण करून नवोन्मेषांचे संरक्षण आणि व्यापारीकरण कसे करावे, याचे व्यावहारिक ज्ञान देण्याच्या उद्देशाने 'आयपी यात्रा' आयोजिल्याचे प्रास्ताविकात सुनील धाडिवाल यांनी सांगितले. अदिती जाधव यांनी सूत्रसंचालन केले. शादाब हुसेन यांनी आभार मानले.